म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

…लय क्रमांक

पुस्तकाचें नांव

१८९

( नाट्यकथामालेंत छापलेलें. )

नारायण हरि भागवत

यांनीं लिहिलें

…

…येराळें छापून प्रसिद्ध केलें.

( पुस्तक …यांनीं सर्व हक्क ठेवले आहेत )

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. 
ठाणें सन १८९

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं.
ता.
ठाणें

स्थळ

न

म

म

ज

# हुंडा प्रहसन.

## स्थळ — जनुभाऊच्या घराची ओटी.

पात्रें:— जनुभाऊ आणि मथुबाई — लग्न जुळविण्याच्या बाबतींतील दलाल

जनुभाऊ — यांच्या मनांतून सदां सर्वकाळ सिंहस्थच रहावा! — पण यांना कुठें ठाऊक आहे, कीं सिंहस्थांत क्षेत्रांतील न्हाव्यांची आणि भटांची चैन चालली असते!

मथुबाई — अहो जनुभाऊ, एकटेंच हो कोणा बरोबर बोलतां आहां?

ज० — बरें झालें मथुबाई, एवढा वेळपर्यंत मी एकटाच होतों, पण आतां तुह्मी बऱ्या दुकटया आलांत!

म० — मी तर आलेंच आहें — पण इतका वेळ तुह्मी तनाना कसली चालवली होतीन?

ज० — अहो कोणालाहि काय — कोणाचा चव्वा थकला—ह्मणजे तो असो नाहीं तशी—कशी तरी तनाना करूं लागायचाच! मी कशाला! तुह्मी नाहीं का करीत?

म०— जळलं मेलं! तुमची आपली खोडच — तुह्माला कुणी कांहीं विचारलं, कीं तुह्मी आपलं त्याच्यावर खोगीर ठेवलंतच!

ज०— भलतंच आपलं कांहीं तरी! मथुबाई, तुह्मी असं पहा — हेंच गेलें वर्ष जर सुटीनें असतें, तर तुमच्या हातांत या पुरणाच्याच का पाटऱ्या रहात्या? नांव कशाला!

म०— हात् तिच्यारे — मी हो कशाला भिते! एक वर्ष कोरडं गेलं, तर त्याची कसर मी एकदम यंदांच आतां काढून घेईन!

ज०— अजून महिना दोन महिन्यांची अवधी आहे, तोंच मथुबाई तुह्मी एव

उलेल्या कसवीच्या तयारीला लागल्यात ! अहो, पण मी ह्मणतों, तुम-
ची आमची गोष्ट गरिबाईची आहे, ह्मणून आपल्याला आपलीं पोटें
जाळण्या करितांच कां ह्मणाना -- उचल याची तंगडी कीं टेव त्या-
च्या डोसक्यावर, असले धंदे करावे लागतात !

म०- इश्राम बाई -- तंगड्या उचलायचे रोजगार तुह्मी करीत असा-
ल, - मी बाई, इतकीं लग्नं जुळवून दिलीं, पण त्यांत दोन्ही घरचीं
बायका काय नि पुरुष काय - माझे गुणच घेतात ! नि वरती ह्मणतात,
'मथूनं ह्मणूनच हें असलं चांगलं स्थळ आह्मांला पाहून दिलंन्' !

इ०- ( मिशीवर हात फिरवून. ) या सुधारलेल्या व सुधारक मंडळीच्या
वर्तुळांत फिरणाऱ्या या फक्कड गृहस्थानें आजपर्यंत जुळवून दिलेल्या
जोडप्यांत पण असाच लौकिक मिळविला आहे ! जेथें फटाकेदार मु-
लगी दृष्टीस पडली, तेथें मोहरेदार तिला नवरा पाहून दिला आहे !
पण असा डौल मारण्यांत मथुबाई, तुह्मी सुधारलेलो बायको - ह्म-
णजे-लेडी ऐवजीं -- नव्हत, असा मात्र माझ्या बोलण्याचा हे-
तु नाहीं हो !

म०- तो कोरडा सुधारल्याचा मला डौल नको. मला आपली साधी भो-
ळी नि जुन्या चालीची बायको लोकांनीं ह्मटली तरच त्यांत माझा ब-
रेपणा आहे. नाहींतर तोंडाकडे पाहून हंसावं, नि मागं वळून नाक
मुरडावं - असलं नको कुणि करायला !

इ० - तें राहूं द्या आतां. तुह्मी नि मी - आपण दोघेंहि सुधाऱ्या पैकीं
नव्हों ह्मणजे झालेंना ?

म०- तसं कशाला ? काम करून आपली मेहेनत चकचकित विल करून
घेण्या पुरती मी आपली सुधारलेली आहें असं कुणी ह्मटलं तरी
मला खपतं. पण इश्राम बाई ! तें दुसऱ्या प्रकारानं सुधारलेली ह्मणवून
घेण्यानं ! - पण हें राहूं द्या आतां. आपली गौडी आपणच गाण्यांत
कांहीं अर्थ नाहीं, तो तनाना कशा बद्दल चालिवली होतीत ती
मोगा पाहूं ?

इ० - मथुबाई, मी हरी आतां तेंच ह्मणणार होतों - कीं आपलें मुळ

विषयाशीं विषयांतरच होत चाललें आहे. माझ्या मनांत विषय कोणता घोळत होता, त्यालाच अनुसरून तुह्मी काय विचारलेंत, आणि तो विषय सोडून आपण कुणिकडे भरकटत चाललों !

म० – होय. झाली मला आठवण मी तुह्मांला काय विचारलें होतें त्याची; तुह्मी तनाना कशाची करीत होतां असं मी तुह्मांला विचारलं.

ज० – मथुताई, अहो तुमची आमची गोष्ट राहूं द्या एकिकडे; पण खिसे सोडून पिशव्यांनीं ज्यांचे पगार हातांतून आणतांना ज्यांच्या हातांना कळा लागतात तेच लोक हुंड्याच्या बाबतींत किती हापापलेले असतात ! त्यांत आश्चर्य हेंच, कीं मुलाचें लग्न करणें ह्मणजे एक प्रकारें त्यांना साडेसातीचा शनी उदरीं आल्या सारखें वाटतें; आणि मुलीचें लग्न, ह्मणजे शनीच्या पिडेचें !

म० – खरंच आहे. देतांना नि घेतांना हात खालवर व्हायचाच !

ज०– देतां घेतांना हात खालवर होऊं द्या – पण त्यांत मजा ही, कीं लग्नाच्या बाबतींत सुधारा करूं इच्छिणारेच रावसाहेब, रावबहादूर, लेक्चरें झोडतांना शब्दांनीं मात्र निरस, आणि कृतींत–अक्षरांनीं सरस !

म० – खरंच आहे- लेक्चरांत पैशाची ऊब नसून शहाणपणा न् लोककल्याणकारीपणा मिरवायचा असतो, तसा प्रकार प्रत्यक्ष लग्नाच्या गोष्टींत नसतो.

ज० – एकूण हें सुधारणा मंडळीचें सर्वच प्रकरणांत ढोंग आहे तर !

म० – जनु भाऊ, तसं आपण ह्मणतां कामा नाहीं- कारण हुंडा जितका ज्यास्ती तितकी आपली हुंडणावळहि ज्यास्ती ! हुंडणावळीचं ... मोडूं लागेल, तर या धंद्यांतून आपले पायच काढून घ्यावे लागतील.

ज० – मग हे लोक आपल्या नांवानें कां खडे फोडतात ?

म०– जनु भाऊ, कळली तुमची अक्कल ! अहो ते लोक तुमच्या आमच्या सारख्यांच्या नांवानें खडे नाहीं फोडीत- पण भटा भिक्षुकांच्या, नि बाजंत्र्यांच्या !

ज० – भिक्षुकीचा धंदा बरोबर चालत नाहीं, ह्मणून मी या धंद्यांत शिरलों आहें, ही गोष्ट खरी– पण भट भिक्षुक आणि बाजंत्री मात्र यांच्या

डोळ्यांत खुपतात ! हाच का असला लोककल्याणाचा योत्रा डौल !

म०– ( इकडे तिकडे पाहून ) इथें नाहीं ना दुसरा कुणी ? नाहीं तर आपलं कानांत सांगितलं पाहिजे !

ज० – कोणि नाहीं—मोठ्यानें बोला.

म०– ज्यांत आपलंच पोट तुडुंब भरेल तोच लोककल्याणाचा धंदा—हा "महामंत्र" आहे, त्याचा अजून तुह्मांला उपदेश झाला नाहीं !

ज० – नाहीं नाहीं—नाहीं खरा !

म० – नाहींच व्हायचा. कारण या मंत्राचा खरा खरा उपदेश फारच थोडयांना होतो, नि तो दिखिल फारच थोडया लोकांच्या फळास येतो ! बाकीचे सैतानी लोक !

ज० – एकून " कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ " या लोकांच्या सदरांत मी पडलों तर !

म०– जनुभाऊ मी तुह्मांला अक्कल शिकवावी अशी गोष्ट नाहीं–पण देव धर्म एकिकडे सोडून ज्यांत आपली पोटपूजा चंगाळोनं होईल , तिकडेच कालमानानं वळावं. ह्यांत पहायला लागाल, तर आजच उपाशीं मराल !

ज०– हें ऐकून आपली तर अक्कल गुंग झालो.

म०– अक्कल गुंग होऊं नका देऊं. पण माझ्या हातांत दोन तीन घबाडं आलीं आहेत, नि तीं रावसाहेबांच आहेत, तर तिकडे तुह्मी आपली पहिरवी करा – मी आतां जातें नि त्याचा सुगावा लवकरच मी तुह्माला देईन. ( दोघेहि जातात. )

# प्रवेश २ रा.

स्थळः— रावसाहेबांचो घरची बसायची कचेरीची जागा.

पात्रेंः— रावसाहेब, रंगुबाई – ( रावसाहेबांचें कुटुंब. ) रामभटजी-उपाध्याय. जनुभाऊ आणि मथुबाई-लग्नें जमिवण्याच्या बाबतींतील दलाल.

र०– भटजी, आमच्या इथला किनई सगळाच कारभार ढिलाईचा–ह्यां

पुसाचा महिना कसा तो संपून जाईल. पण अजून कोणाला हो कीं नाहीं ह्मणून सांगायचं होत नाहीं ! मेलं कार्याच्या सामानाला तें कधीं लागायचं ?

राव०– भटजी, तुह्मी असें पहा, कीं एकदां पंचांग काढून दिवस आधीं मोजून दाखवा. आजची आठवी ना ?

रं०– दिवसभर मेली इंग्रजी तारीख तोंडांत बसलेली ! मला वाटतं त्रिठ्या पाठवून नवरा नवरीच्या हातांत हात घालून रुपया दोन रुपयांत लग्नं उरकून टाकायचीं आहेत ! जळलीग बाई ती रीत ! तिला लग्नि कुणी ह्मणावं !

राम०– काकू, लोकांजवळ बोलतांना रावसाहेब तसें दाखवितात, पण धर्मनिष्टा त्यांची फार चांगली आहे.

रं०– भटजी, मामंजी होते तों पर्यंत आमचे इथें तुमचा कांहीं तोंडपुजेपणा नव्हता–पण तो अलिकडे फारच वाढत चालला आहे. भटजी, मी तुह्माला आपलं खरं आहे तें सांगतें, मामंजींच्या नांवानं आंवसेचा ब्राह्मण तिकडून ह्मणून कधीं सांगायचं होतच नाहीं–मीच आपली आहे नि माझ्या माहेरचा मोला चांगला आहे, ह्मणून इकडे ठिक आहे, नाहीं तर हो तुह्मांला, नि इथे कोण विचारतं ? नांव कशाला !

राम०– काकू, आतां बरिक माझ्याच्यानें कांहीं बोलवत नाहीं.

रं०– भटजी, तुह्मी पक्कें समजून ठेवा, कीं मी असलाची आहें, नाहीं तर अशा बोलण्यानीं दुसरी एकादी केव्हांच असला भटच नको ह्मणून हातांत जळकं लांकूड घेऊन पाठीस लागती !

राम०– ( मनांत. ) माझ्या आई मजवर तूं मोठी मेहेरबानीच केलीस. नाहीं तर आतांच्या बायकांना लांकडाला आणि त्यांत जळक्या, ह्मणजे महत् चांडाळ स्पर्शा प्रमाणें विटाळ झाला आहे ! आणि त्या ऐवजीं हातांत पवित्र चामड्यानें मढविलेलीं बुकें, नाहींतर खासा नामी काळा कुळकुळित बुट घेऊन पाठीस लागायची असें ह्मणायची !

राव०– ( मनांत. ) अष्टमी ह्मणायच्या ठिकाणीं आठवी ह्मटलें ! इतकेंच काय तें बोललों–त्याचा हा आंवसे पर्यंत परिणाम येऊन पोंचला !

तरी आमची बायको आर्यमहिला समाजांतली झाली नाहीं ! नाहीं तर स्वातंत्र्याची भलतीच धडक मारती !

रं०- भटजी, मी काय कोणाला विचारलं त्याचा अजून मला जाब नाहीं मिळाला ! मामंजी असते म्हणजे मला कांहीं काळजी नव्हती—

राव०- भटजी, आठ गेले, बाकी उरले सात – आणि पुढचे पंधरा–मिळून ७ आणि १५ बावीस दिवस, म्हणजे तब्बल पाऊण महिना आहे. इतक्या अवकाशांत दोनच काय परंतु ९९ लग्नं ठरवून १०० करतां येतील !

राम०- काकू, रावसाहेबांचें सगळेंच, बोलणें देखील वाढथ्यानें चालतें !

रं० – करण्यांत कांहीं यायचं नाहीं – मग बोलण्यांत वाढवा तरी कां कमी ! असं कां बोलायचं होतं म्हणून बोलणारं उरलं आहे का आतां कुणी ?

राव०- कांहो रामभटजी, या पेक्षां तें आणखी कोण ज्यास्त पुसणारें आम्हांला असायचें ?

रं०-हीं असलीं गोडगोड बोलणीं बोलून वेळ घालवायचा नि मग कांहींतरी निमित्त करून बाहेर निघून जायचं- आणखी काय ?

राम०- या तुमच्या उभयतांच्या विनोदी भाषणांत माझें भटाचें तें तोंड कशाला ?

रं०- हा मेला कसला कोणत्या गांवचा विनोद ! चार लोकांत आपल्या नांवा लौकिकाला साजेल असं नकोका करायला ? आज महिना झाला, त्या मुलीला चांगलीं नांवालौकिकाचीं दोन चार स्थळं आलीं आहेत-- त्यांतून एकादं शंपन्नास कमी का जास्त करून ठरवायचं होतं-म्हणजे नथूचंही लग्न कायम करायला ठीक पडतं. भटजी, आमच्या नथूला तर मुली किनई पायां पडून येताहेत.

राम०- [ हांसत ] तुमचें स्थळच तसें आहे. तुमच्या इथें म्हणजे- माझ्या सारखा भिकारडा भिक्षुक कां असेना-रावसाहेबांनीं हजार रुपये हुंडा मागितला, तर भिक मागून आणखी पांचशें रुपये जास्त द्या आणि पोरगी करा म्हणून पाठीस लागायचा ! अहो असें तुमच्यासारखें, सासू सुरेख, सासरा फक्कड, मुलगा दाणा–पैसे रेलचेल, असें मांदतें स्थळ

आजच्या काळांत १० । २० हजारांत मिळणें कठीण !

राव० - भटजी असो कोणतीहि गोष्ट करणें झाली, तरी ती मोठ्या विचारपूर्वक करावी लागते. त्यांतून या आहेत लग्नाच्या गोष्टी; फार फार विचारपूर्वकच केल्या पाहिजेत.

राम० - खरेंच. आणि ती रात्रंदिवस लोकांचे कज्जे तोडण्यांत गुंतलेला जी संवय लागली आहे, तीच या ठिकाणीं देखील आडवी यायची. मला ठाऊक नाहीं कां-तुम्ही मकरांतली भाजी खायची का होईना, परंतु त्यांत देखील रावसाहेबांचा विचार होत नसेल असें मला कांहीं वाटत नाहीं.

राव० - अहो भाजी जी खातों ती फक्त भटजी तुमच्या सारख्यालाच माहित. भाजी खाण्यापासून जर आमचा विचार चालतो, तर आलें स्थळ कीं टाक हो म्हणून जुळवून, असें आमच्यानें कसें व्हावें ? त्याला हो किंवा नाहीं म्हणायला वेळच पाहिजे.

राम० - हो हो पाहिजे तर ! नको कसा- लग्नाची गोष्ट आहे कीं थट्टा आहे-अशा कामांत तर आपल्या सारख्यांनीं अवश्य विचार केलाच पाहिजे ! असतें काय भटांचें ! एखाद्या गरिबाची मुलगी सांपडली, कीं धर आण आणि चार खोट्या नाट्या थापा मारून टाक एकदाचें सावधान करून ! तसा का तुमचा प्रकार आहे ? किती केलें तरी रावसाहेबीच थाटानें झालें पाहिजे !

रं० - मी मनांत म्हणत होतें, कीं आजपर्यंत एकट्या एकट्या गोष्टी काढून पुष्कळ वेळां पाहिलें-आज अनायासें रजेच्या दिवशीं भटजी आहेत, नि दुसरेंहि पण कुणी नाहीं, असं पाहून मुद्दाम मी आतां गोष्ट काढली, पण मेली मी आतां लग्नाची म्हणून फिरून गोष्ट काढावें कशाला ? येऊन जाऊन मेला जीव जळतो पोरी करितां - तिला एकदाचें चागलं स्थळ मिळून सुस्थळीं पडली, म्हणजे तिच्या रिणांतून मुक्त झालें.

राव०- भटजी, या पोरीवर कीं नाहीं माझी अत्यंत प्रीति असल्यानें तिला मला नजरे आड करवायची नाहीं. नाहींतर लग्न ठरलें, कीं ति-

चं ठरलेंच झणून समजायचें. मी आमच्या चिमणीचें लग्न तर अगदीं जुळविल्या सारखेंच आहे झणाना?

रं०– चिमणीचा तर ताईत गळ्यांत करून बांधायचा होता! मेल्यानों, नथू-चं आधीं लग्न ठरविल्यावर मग चिमणीचें ठरवाचें– हें हेंगाडें शास्त्र कुणिकडचं?

राव०– ऐकाल का? – हें कांहीं हेंगाडें शास्त्र नाहीं. पण हें आहे पोलिटिकल इकानमीचें, झणजे अर्थशास्त्राचें कोडें. आणि तें समजण्याला तुमच्या सारख्या बायकांना खरोखर लिबरल एज्युकेशनच पाहिजे. तें जर तुमच्या जवळ नाहीं, तर आतां पुढें बोलून राग मात्र यायचा!

रं० – अर्थशास्त्र नि व्यर्थशास्त्र काय पाहिजेल तीं चालूं द्यात्रीं आतां स्वस्थपणीं. रामभटजी, मी तुझाला खरं खरं सांगतें–चिमणीला १० वं सहून उद्यां ११ वं वर्ष लागेल, आणखी कांहीं दिवस वाट पाहीन; नंतर पोरीला उचलीन नि एकटीच माझ्या माहेरीं जाईन–मग जसा गरीब मिळो वा श्रीमंत मिळो, नवरा पाहून आपली तिचं लगीन कसं उरकून घेईन. माहेरीं जाऊन पोरीचं लगीन केलं एवढंच झणून लोकं हांसतील ना? हांसोत परतीं.

राव० – पोरीला उचलून घेऊन माहेरीं तिचं लग्न करण्या करतां जायचें झणजे आपली हौदावरून कळशी भरून आणल्या सारखेंच!

राम० - काकू उगीच रागाच्या सपाट्यांत विनोदानें असें बोलल्या झणून त्या का असें करणाऱ्या आहेत?

राव०– भटजी, मी तरी हें विनोदीच बोलणें बोलतों. आणि मला ठाऊक कीं आमच्या इथलीं माणसें कांहीं अक्कल घेणारीं नाहींत!

राम० – कुलीन माणसांशीं संबंध जो ठेवावा लागतो तो याच करितां.

राव०– ( मनांत, ) हल्लींचा कुलीनपणा झाला आहे निराळा, तो या जुनाट शावळ भटाला कुठें समजला आहे! मी पहातों आहें, कीं आपला पैसा बाहेर न जातां घरांत येईल तितका बरा–बाकीचीं सगळीं सुखें आहेत पैशा अंतीं – आज माझ्या पोरीला लोकांचे घरीं देऊन तिला का तात्रेदारीण करूं–आज माझ्या सारख्या शहाण्याच्या हातून अशी

गोष्ट कधींहि व्हायची नाहीं; तर यांच्या जवळ हा इतकाच विषय सोडून आपण बाहेर चलावें हें उत्तम.— ( मोठ्यानें ) भटजी, आज एका वड्या गृहस्थाच्या भेटीला आम्हांला रेलवे-स्टेशनवर जायचें आहे, तर आम्ही जातों. आपल्या इथल्या लग्नाच्या बाबतींत बोलण्याकरितां जनुभाऊ येणार आहेत; तर मी बाहेर गेल्याचें त्यांना सांगून जवळ कांहीं बोलणें होईल तों पर्यंत तुम्ही येथेंच असा—

ई०— मथुबाईनं दिखिल आजच येतें म्हणून सांगितलं आहे — असं कुणि बोलायला यायचं असलं म्हणजे आपलं बाहेर जाणं जसं आधरून ठेवलेलंच !

राव०— आज तुमच्या जवळ त्यांचें बोलणें होऊं द्या—त्यांचा रागरंग कसा काय आहे तो कळला म्हणजे आम्हांला बोलायला ठिक पडेल. जाऊं तर मी आतां—गेलों आं ? ( जातो, जनुभाऊ येतो. )

ज०— नमस्कार रामभटजी.—

राम० — या तुम्ही जनुभाऊ — रांडलेकाचा जनुभटाचा आतांशा जनुभाऊ झाला !

ज० — रामभटजी, तुम्ही काळ्याचे पांढरे केंस होई पर्यंत आपले भटच्या भटच राहिलेत, म्हणून मी देखील आपला भटच रहावें वाटतें ? जळोरे तुमचा हल्लींचा भिक्षुकीचा धंदा, त्यापेक्षां एखाद्याची—म्हणूं का आतां ? पण नको — पिकदाणी धुवून रहाळेलं फार चांगलें !

राम० — भेलास रे तूं रांडलेका—

ज० — रामभटजी, तुम्ही कांहीं रागावूं नका—मी तो तुमचा भिक्षुकीचा धंदा सोडला म्हणूनच हें असलें चक्रीदार पागोटें डोकीला लटकावून हिंडूं लागलों. श्राद्धपक्षाचे आमंत्रण करितां मला आतां यजमानाची वर्षभर खुषामत करावी नाहीं लागत !

ई० — हे असले खुषामती भट असले, म्हणजे यजमानास होस हो देणारे असतात !

ज० — हें आलें आमचें भिक्षुकी गुऱ्हाळच चाललें ! बरें तें असो. काकूसाहेब, रावसाहेब आहेत कां घरांत !

र०- मुकतंच बाहेर जाणं झालं.

राम०- जनुभाऊ तुह्मी ज्या करितां आलां आहांत त्या बद्दल जें कांहीं बोलणं असेल, तें काकूंच्या जवळ बोलून ठेवण्यास रावसाहेब सांगुन गेले आहेत.

ज०- रावसाहेब असते तरी तें सगळें बोलणें मला काकू साहेबांच्या देखतच बोलायचें होतें. कारण काकू साहेबांची एकदा कां मंजूरी मिळाली ह्मणजे ती ब्रह्मदेवाच्यानें देखील फिरायची नाहीं.

राम० - कोण कोणतीं स्थळें आणलीं आहेत, आणि हुंडा कसा काय आहे ?

म० - ( मनांत ) या जुळ्या जुळत्रींत ज्या गृहस्थाशीं आपली गांठ आहे, तो चावून चिकट असल्यानें आपला हात साधायचा तो आधींच साधून घेतला पाहिजे. नाहीं तर मागाहून यांच्यापाशीं शिमग्याचीच वेळ येणार ! ( मोठ्यानें ) रामभटजी, माझ्या जवळ स्थळेंहि चांगलीं आहेत, आणि हुंडेहि पण चांगले आहेत. जशा मासल्याचें रावसाहेबांना हवें असेल, तशा मासल्याचें माझ्या जवळ हजर.

राम०- काकू, हा जनुभाऊ काय बोलला तें कळलें का तुह्मांला ?

र०- मला सगळं कळलं भटजी. जनुभाऊ, मामंजीं पासून आमच्या इथली रित भात तुह्मांला ठाऊक आहेच- तेव्हां दोहीं कडून जें चांगलं नि मुलगी सुरेख असेल त्याच स्थळा विषयीं जें काय बोलायचं असेल तें बोला. [ इतक्यांत मथुबाई येते. ]

राम०- आजचा किनाहीं काकू-एक रावसाहेबांवांचून कपिलाषष्ठी सारखा योग जमून आला ! आपलीं कामाधंद्याचीं आणि माहितगार मथुबाई सारखीं माणसें देखील अशा वेळीं हजर !

र०- या तुह्मी मथुराबाई-बसा अशा. [ बसते. ]

म०- आज किनई काकू, मला आहे फार गर्दी - एक केस पहायला जायचं आहे, नि मनुष्य नू गाडी बाहेर उभीच आहे ! उभ्या उभ्या आंतून जाऊन येतें असं सांगून मी ही आंत आलें.

र०- तुह्मांला ह्मणजे कधीं गर्दी नाहीं नि सारकाचीनं आल्यात असं एक

दिवस दिखील झालं नाहीं. [ अंमळ रागा सारखें करून ] बरं, तर आ–मग इतक्या घाईनं तरी आल्यात कशाला ? ... ...

म०– काकू कांहीं रागावायला नको, तसंच घाईघाईचं काम म्हणून गर्दीत गर्दी करून आलं – मेला माझा जीव किनई रामभटजी, इतका यांच्याकडे ओढतो !

ज०– मी पहाना – आतलीं २७ कामं सोडून आधीं इकडे आलों तो !

राम०– तुम्हीचशी काय? पण सगळ्या लोकांचा जीव ओढून घेण्या बाबतींत ह घराणेंच तसं बाळबोध आहे ! त्यांत आमच्या काकूंचा स्वभाव तर कांहीं बोलायलाच नको.

र०– भटजी हीं स्तुतीचीं बोलणीं किनई मला कांहीं आवडत नाहीं–

ज०– थोरांची चालच अशी असते, किं त्यांना स्तुति ही प्रिय कधींच होत नाहीं !

म०– चिमणीच्या लग्नाचा जर कांहीं विचार असला तर तिच्या रुपा प्रमाणें नि तुमच्या तोंडोला तोंड उतिरणारीं एक दोन स्थळं माझ्या पहाण्यांत आहेत नि शोधुं गेलं तर तशीं सांपडणारीं नाहींत !

र०– असं ग काय म्हणतेस, तिला उद्यां ११ वं वर्ष लागेल. अजून तिला ती कितो मोठी करणार !

म०– जनुभाऊ, मी तरी हें काकूंना भोतभीतच विचारलं – कारण रावसाहेबांच्या व्याख्यानाला मी नेहमीची जाणारी आहें !

ज०– अहो तें व्याख्यानांतलें व्याख्यानांत – पण तें घरीं काकूसाहेबांच्या पुढें चाललें पाहिजे ना ?

राम०– असेंच कांहीं नाहीं जनुभाऊ. रावसाहेब ते आपले बाहेरून लोकांकरितां तसे आहेत–पण आंतून सगळं कांहीं जसं असावें तसेंच आहेत ! हें एक त्यांचें शहाणपणाचें वर्तन आहे !

म०– तर चांगलसं स्थळ मिळालं तर चिमणीच्या लग्नाचा तुमचा बेत आहे तर !

र०– माझ्या तर मनांतून म्हणाल किनई, आधीं चिमणीचं नि लागलंच नमल्यास नयुचंहि पण लगीन करून घेण्याचा विचार आहे. पण अद्या

घरांत किचार होईल वसे. मी आज महिनाभर घरांत पाहीत लागलें आहे, कीं मुलगी रोजच्यारोज उंसाच्या कांड्यासारखी वाढत चालली आहे. एकादं स्थळ पहा नि लवकर तिचं लगीन करून टाका— मथूकरतां कुणि नाहीं हंसायचं—पोर मोठी दिसूं लागली तर लोक हांसायचे; पण माझं ह्मणून कांहीं कोणि ऐकायचं नाहीं—

ज०— मथूबाई, रावसाहेब ह्मणजे काकूंच्या अर्ध्या वचनांत! हें आपलें उगीच त्यांचें मोठेपणाचें बोलणें आहे!

रं०— बरं तसंच कां होईना!

ज०- मग काय होईल तें होवो-- मथूबाई, यंदा दोन्ही लग्नांचे बार उडवायचे! मुलाची कामगिरी मी संभाळतों, आणि मुलीची तुह्मी संभाळा।

म०— जनुभाऊ, माझ्या कडून किंनईं स्थळं तयार असल्या सारखीं आहेत, आज नुस्ता करण्या न करण्याचा सुगावा घेऊन मग ठरवा ठरवीच्या विभागाला लागायचं असं होतं. आतां मी माझ्या उद्योगाला लागतें. मी किंनईं चिमणीला एक सोडून एकापेक्षां एक वरचढ असे पसंत करण्याकरितां दहा नवरे आणून पुढें उभे करीन!

ज०— तुह्मी तें जुळवून द्या—कीं मथूबाई—मी नथूसाहेबांना नवऱ्याच नवऱ्या आणून देतों! पहा तर खऱ्या माझी करामत.

रं०— मथुबाई, जनुभाऊ—मी तुह्मांला दोघांनाहि सांगून ठेवतें— मला किंनईं पहाण्या बिहिण्याच्या फारसं भरीस पाडूं नका. मुलगा जो पहायचा तो दहां सारखा देखणा असून चांगला हुषार असला, नि घरचा बरासा असून आमच्या इतपत असला तरी मला पुरे — तशीच मुलगी कोळशांतलं माणिक नसून काळुंद्री कुणि ह्मटलन् नाहीं, नि हुंडा देऊन करणी चांगली करणारी असली ह्मणजे पुरे—

ज०— हें सगळें मला ठाऊक होतेंच— पण काकू तुमच्या तोंडुन आतां तेंच निघालें त्यामुळें मला आतां शंका ह्मणून राहिली नाहीं. आतां भरदिशीं अशीं स्थळें पाहून रावसाहेबांच्या पुढें हजरच करतों!

म०— बरं तर काकू जाऊं मी आतां— जनुभाऊ तुह्मांला चलायचं असलं तर चला; गाडींतून नेतें. तुमच्याच घरावरून माझी गाडी जायची आहे.

ज०— काकू मीहि पण येतों आतां.

रं०— या. — ( दोघं जातात. )

राम०— काकू, त्या मथुगला कुंकूं नाहीं लावलेंन, आणि तुह्मी विसरल्यात पण तिनेंहि कुंकूं आगा ह्मणुन नाहीं ह्मटलन्-

रं०— भटजी जें आहे तें बोलुं नये इतकंच—आमच्या इथें आवडतं ह्मणून असल्या लोकांना येऊं द्यायचं—नाहीं तर यांना उंबरठ्याच्या आंत डोकावूं देणां उपयोग नाहीं.

राम०— हं—तुह्मी आपल्या गंगारूपी माउली आहांत ह्मणून थोडासा आमचा समाचार घेतां आणखी काय ! असो चला—उद्यां आमच्या एका जुनाट यजमानाच्या येथें कांहीं अनुष्टान सुरू करायचें आहे तिकडे मी जातों. [ जातात. ]

# प्रवेश ३ रा.

स्थळः— रस्ता.

पात्रेंः— जनुभाऊ, — मथुबाई, — रावसाहेब.

ज० — मथुबाई — अहो गाडी बाहेर उभी आहे ह्मणून जायची घाई तरी किती केलीन ! आणि गाडी तर कुठेंच दिसत नाहीं !

म०— ना पैशाचा फायदा, ना कांहीं—ना रावसाहेब घरांत. उगीच तिथें गप्पा छाटीत बसण्यांत कांहीं अर्थ आहे ?

ज०— एकून तुह्मी तर मला आपली गाडीची थापच मारून बाहेर काढलेंत !

म०— जनुभाऊ, अहो तुह्मी धंदा करायला निघालेत, नि असे लघाळपणीं जिथें तिथें गोष्टी सांगत बसूं लागलेत, तर हो तुह्माला नि तुमच्या बोलण्याला वजन कसं येईल ?

ज०— [ मनांत ] ही तर माझी गुर्वीण होऊं पहाते ! कां घटकाभर वेढ नाहीं घेतलें ? ( मोठ्यानें. ) तर मग ?

म०— तर मग काय ? अहो काम नसलं तरी उगीचच कामाचा सुळसुळा-

ट दाखवायचा, नि वेळ नाहीं म्हणून म्हणत असावं.

ज०– असं काय ? म्हणजे वनन येतं !

म०– अहो, हल्लींच्या लोकांत अशीच टुम पडून गेली आहे ! कांहीं त्यांना काम नसतं – नुसत्या तोंडावरच्या माशा मारायच्या ! पण कोणि त्यांना भेटायला गेलं, कीं आधीं चिठी पाठवावी लागते – नि मग त्यांनीं चिठ्ठीचा जबाब लिहायचा, कीं आज फुरसद नाहीं – नि उद्यां होईल किं नाहीं तं आज सांगतां येत नाहीं !

ज० – मग तर आपण देखील अशीच धांदलबाजी केली पाहिजे !

म० – असं केल्या वांचून या मंडळांत आपला चांगलासा वस्त बसायचा नाहीं !

ज०– अहो वस्त बसविण्यांत मी कसला वस्ताद आहें ! मी आहें असा– पण या सगळ्यांच्या बारशाला पाणी प्यायलेला आहें !

म०– हो. शिकवल्यानं शहाणे होणारे लोक मी पुष्कळ पाहिले आहेत बरं कां जनुभाऊ – बरं तें राहून द्या आतां. तुम्हांला मी जें एकिकडे बोलावलं, त्यांतलं कांहीं आलं कां तुमच्या लक्ष्यांत ?

ज०– ( मनांत ) हिनें आणलीच परीक्षेची वेळ ! पण मी कसला वस्ताद आहें, तो कुठें इला ठाऊक आहें ! ( मोठ्यानं ) आपण तर तुम्ही सांगितलेल्या सुगाव्यावर नेमके येऊन पोंचलों किं नाहीं ! नसेन तर बोला– बोला पाहूं आतां काय तें, मग मी लक्षांत आणतों.

म०– अहाहा हो जनुभाऊ ! मी म्हटलं तुम्ही अशी मुर्ख काम दिखिल करून टाकलं असेल ! पण इथं काय तुमच्यापाशी आतां ओनामा पासून पाढा वाचला पाहिजे ! अहो त्या रावसाहेबा जवळ कांहीं बोलणं करून ठेवलं आहेत कां ? नाहीं तर जांवई नि सून मिळेल त्याला नि तुमच्या आमच्या हातांत कांहीं नाहींशी वेळ यायची हो !

ज०– मथुबाई, मी किंनाहीं आपल्या मना जवळ इतकं बोलणं करून ठेवलं आहे, किं रावसाहेब म्हणजे त्यांच्या मोठेपणाला भुलतां उपयोग नाहीं––

म०– अहो तर त्याच करतां म्हणून मी तुम्हांला मुद्दाम विचारलं.

ज०-- मग तर ऐकून घ्या आधीं -- अहो तो पहिल्या नंबरचा छट ! त्या घ्या जवळ म्हटलें म्हणजे आपण आपला हात आधींच साधून घेतला पाहिजे !

म० -- अहो छट राहूं द्या -- नुसताच छट असला तर तो काय करणार ! पण पडला कायदशीर, नि त्यांत अंमलदार.

ज०-- म्हणूनच तर मी म्हणतोंना--कीं आपला लाग तो सगळा आधींच साधून घेतला पाहिजे !

म०-- त्यांचीच तर योजना कशी करायची म्हणुन तर मी तुम्हांला गाडी-च्या निमित्तानें एकीकडे बोलावलं; आतां समजलांत कां तुम्ही ! [ पुढें पाहून, ] त पहा-- ज्यांच्या घरीं आपण गेलों होतों ती स्वारी जेठा मोडुन पागोटं सरसावण्याच्या बेतांत आहे !

ज०-- होय. रावसाहेबच ते ! आगीच्या गाडीवर कोणाला सें भेटायला म्हणून गेले होते ! -- पण बोलतां बोलतां आपण या हवा खायच्या जागेवर आलों !

म०-- जनुभाऊ, पहालंत हें ! आगीनगाडीवर जायचं सोंग नि उगीच इथें कामा वांचुन मागा मागीत बसायचं ! आला किनई माझ्या सांगण्याचा तुम्हांला खरेपणा ! [ पुन्हा पाहून, ] हं स्वारी इकून आप-ल्याचकडे यायला लागली बरं--तर या गोष्टी पुरे -- दुसरंच कांहीं तरी आपण बोलूं लागूं.

ज०-- चार एक वर्षांपूर्वी हें तळें या दिवसांत अगदीं आटून जायचें-- पण वर पहावें, तर आंब्याचीं झाडें जशीं मोहोरानें भरगच दिसताहेत; तसा-च हा तलावहि पण पाण्यानें तुडुंब भरला आहे !

म०-- तुम्हांला नाहीं का ठाऊक ? -- अहो त्या कालव्याचं पाणी तळ्यांत सोडूं लागल्या पासून हें तळं भरलेलंच असतं. ( इतक्यांत रावसाहेब जनुभाऊकडे पहाल्या सारखें करून, )

रा०-- ओ -- जनुभाऊ--

ज०-- नमस्कार रावसाहेब.

रा०-- ऑलो, अरे हें कोण दुसरें ! [ हातांत हात घालून, ] गुड इव्हिनिंग-

अ०- ( मनांत, ) हो पडाली ! शिकुंडंडी कीं काय तो ! आतरुया मस्क-
स्काराला तुरुया हात देखील वर गेला नाहीं !

म०- आज पार्टीला जायचा बेत नाहीं वाटतं ?

रा०- आह्मांला जायचें इन्व्हिटेशन् असलें ह्मणजे आर्धी आपली स्वारी
पुढें असायचीच ! त्या वांचून पार्टीला शोभा तरी कशी येणार !

म०- मला तर इन्व्हिटेशनवर इन्व्हिटेशन् असतात–पण माझ्या कामाच्या
गर्दीमुळें मी आताशा जाणं सोडलं–पण आज तुमची पार्टी होती ना ?

रा०- अं: त्यांत अलिकडे अलिकडे तर फारच हलकट प्रकार होऊं लाग-
ला, तेव्हां पासून जाण्याचें मी तर सोडून दिलें. बरें पण आज अशी
हवा खाण्याला तुह्मांला सवड कशी सांपडली ? आणि त्यांत आश्चर्य-
एकट्याच आणि पायीं कशा ?

म०- रावसाहेब, तुमच्या सारखे ऑनरी ऑनरीनं पगार मिळविणारी
मागलं ( मनांत, ) बोलूं कां–आपल्यावर येणाऱ्या पार्टीला भिऊन–र
ण नको. ( मोठ्यानें, ) जर एकटीच पायीं फिरूं लागलीं, तर मज सा-
रखीला काय हरकत आहे ? पण तसंहि नाहीं– आज दोन चार दिवस
मजजवळ एक केस कांहीं भानगडीची आली आहे, तिचा एकांत ब-
सून विचार करण्या करितां मी इकडे येत होतें, तों इथेंच या कोपऱ्यावर-
र जनुभाऊहि भेटले.

रा०- ऑ– अरे जनुभाऊ तर आज आमच्या येथें यायचा होता!

म०- होय. ते नि मी दोघेंहि जण आपल्या घरून बरोबरच बाहेर पडलों.

अ०- मी आर्धींचा केवढा वेळ जाऊन बसलें होतें–मागाहून बऱ्याच वे-
ळानें या आल्या आणि लगे लगें थोडंस बोलून आपल्या गाडींतून म-
ला घरीं पोंचविलें आणि चालत्या झाल्या.

रा०- जनुभाऊ, तुम्ही हो इकडे कुणिकडे ?

ज०- आपला असाच हवा खायला ! आपले बडे बडे लोक रोज हवा
खातात– आपण हि खाऊं आज ह्मटलं !

रा०- व : शाबास जनुभाऊ–

म.– बरं तें असो; असं या पाहूं. पण कशाला जनुभाऊ कांहीं कुणि

परका नाहीं. आपल्या चिमणीला एक जहागीरदाराचं स्थळ आहे.

रा०– मुलगा कसा काय आहे ?

म०– मुलगा सुरेख आहे. वयानं अगदीं बेतास बात आहे. दागदागिने पुष्कळ घालतील.

रा०– या सर्व गोष्टींनीं मुलगा तुह्मांला पटतो कां ?

म० मला पटतो मुलगा– ह्मणूनच मी ही गोष्ट काढली.

रा०– पण हुंड्याचें मान कसें काय आहे ?

म०– तेवढंच तर कठीण– तीन हजार !

ज०– जहागीरदाराचें स्थळ मिळाल्यावर रावसाहेब तीन नाहीं पांच हजार देखील हुंडा देतील !

रा०– (मनांत.) आतां तर मोठ्या सफाईनें यांना गार करून टाकलें पाहिजे. (मोठ्यानें) लग्नाच्या बाबतींत तर माझीं मतें जगप्रसिद्ध झालीं आहेत. आणि जाहागीरदारांचीं पोरें ह्मणजे शुद्ध हणगोबा असतात ! असा आमचा अनुभव आहे !

म०– मग एखाद्या गरीबाचा हुशारसा मुलगा असला तर चालेल कां ?

रा०– तो भाग आहे निराळा – पण आमच्या नथूसाहेबांचें लग्न आधीं ठरण्यापूर्वी चिमाताईच्या लग्नाचा मला विचारच कर्तव्य नाहीं.

म०– ⎫ [ दोघे एकदम ] पण काकूसाहेबांच्या मनांतून चिमाताईचं आ-
ज०– ⎭ धीं लग्न ठरलं ह्मणजे मग नथूसाहेबांचं; नथूसाहेबांच्या लग्नाची कांहीं घाई नाहीं; असं आहे.

रा०– मथुबाई, जनुभाऊ विचाराच्या बाबतींत आपला शुद्ध * आहे ह्मटलें तरी चालेल. पण आह्मांला अर्थशास्त्र वांचून एक पाऊलहि पुढें टाकतां येणार नाहीं हें कसें तुमच्या लक्षांत आलें नाहीं ! तर तुह्मी दोघेहि फिरून ऐकून ठेवा, कीं नथूसाहेबांचें लग्न ठरल्या पूर्वी मला चिमाताईच्या लग्नाची गोष्टच बोलणें नाहीं.

ज०- पहालेंत हें रावसाहेबांचें कसें विचारपूर्वक करणें आहे तें ! नाहीं तर आपले आमचे जुने लोक हुंड्याला मात्र हापापलेले ! ठरीव हुंडा, कीं जुळीव लग्न ! –

म०— जनुभाऊ, हा एक लग्नाच्या बाबतींत रावसाहेबां पासून तुह्मांला मंत्रच शिकून घेण्या सारखा आहे !

ज०— तुह्मी तो आतां काळजी बाळगूं नका. रावसाहेबांच्या मंत्रावर माझीं तंत्रें पण मी चांगलींच चालवितों.

रा०— [ मनांत. ] हे लोक लग्नें जुळविण्याच्या बाबतींत संभावित दलाली करतात असें माझ्या ऐकण्यांत आहे. परंतु माझ्या जवळून हे कशी दलाली घेतात तें मला पाहिलेंच पाहिजे ! पण यांना मधाचें बोट दाखिवण्यांत मात्र चुक होतां उपयोगी नाहीं. ( मोठ्यानें. ) जनुभाऊ, अर्थशास्त्र हा शद्ब देखील तुह्मांला ठाऊक नाहीं ! पण मथुबाई, माझें अर्थशास्त्र तुमच्या दोघांच्या मदतीनें बरोबर साधलें ह्मणजे तुमची त्यांत तुमच्या हेतू प्रमाणें संभावना माझ्या घरच्या पेटींत आहे असें खास समजा.

ज०— शिवस्व शिवस्व ! काय असें हें रावसाहेब आपण बोलतां ? अशा आपल्या सारख्यांच्या कामांत मला पैसे मिळवायचे असले, तर गांवांत लोक कां थोडे आहेत !

म०— रावसाहेब, मी नाहीं तर तुमच्या इथल्या पंचाईतींत पडत ! आपल्या घरचंसं काम समजून, नि मी हुडून नाहीं हो—पण तुमचा माझा चांगला परिचय आहे अशा समजुतीनं दोघा तिघा चांगल्या गृहस्थांनीं मज जवळ गोष्ट काढली ह्मणून !—माझ्या कामांनीं मला जेवण्याची फुरसत होत नाहीं, ती हो मी असल्या भानगडींत कशाला पडतें !

रा०— [ थोडेसें शरमल्या सारखें होऊन, ] तशा अर्थानें मी कांहीं बोललों नाहीं. पण आमच्या येथें अशीं मंगलकार्यें झालीं असतां, तुह्मांला देण्याचे पोषाग ते माझ्या जवळ तयार आहेत, इतकाच काय तो माझ्या बोलण्याचा भावार्थ होता !

ज०— अशीं आपल्या घरीं रोज मंगलकार्यें होऊं द्या — ह्मणजे आह्मी पोषाग घेण्यास रोज तयार होऊं कीं !

म०— लाख रुपयांची गोष्ट बोललेत जनुभाऊ !

राव०— ( मनांत, ) यांच्या तोंडाला पानें पुसलीं पाहिजेत खरीं ! ( मोठ्यानें, ) आमच्या घरचीं कार्यें तुमचींच आहेत असें समजून, तुम-

ख्यात मर्जी प्रमाणें मी कबूल करीन. आतां तुह्मांला वाटतील तशीं स्थळें पहा आणि मला कळवा. आपला लग्नं लावण्याचा मात्र धनी मी. बराच वेळ येथें आपण बोलत उभे राहिलों; तर मथुबाई, तुमच्या विचाराची आह्मी आतां खोटी करीत नाहीं. आणि आज आह्मांला निराळ्याच एका ठिकाणचें बोलावणें आहे, तिकडे गेल्यास सवडी प्रमाणें जाण्याचा विचार आहे, तर आह्मी रजा घेतों. ( शेकह्यांड करून व नमस्कार घेऊन जातो. )

म०– जनुभाऊ, या राजश्रीचा सगळा अदमास लागला !

ज०– मला तर असा दिसतो, कीं मुलाच्या लग्नाच्या हुंडयांत मुलीचें सालंकृत कन्यादान करून तिच्या चोळी बांगडीकरितां एखादा गांव खरेदी करणाराचा आहे !

म०– ह्मणून ह्मणतें. जनुभाऊ – आतां आपल्यांत कसर नको. ह्यांचा परोपकारी बाणा दाखिवण्याची ही संधि उत्तम आहे ! पण समजलेत ना परोपकारीपणा ह्मणजे कोणता तो !

ज०– गडगंज आपली नमन करणें हाच ना ! आतां रावसाहेबाला ह्मणावें जनुभाऊशीं गांठ आहे, आणि मथुबाईचा सल्ला आहे !

म०– तर फिरा परत नि आपल्या उद्योगाला लागा. ( जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थळः– जनुभाऊचें घर.

पात्रें– जनुभाऊ– जेल्बा नाईक– रामोशी. धारवा– एक सरदारी घराण्यांतील खालावलेला पुरुष.

ज०– ( आपल्याशींच ) हा पिळदार ब्राह्मण बरा आहे– ह्यांत पट्टितला भिक्षुक– आणि स्वकर्मानें पोट भरेना, ह्मणून नाइलाजास्तव हा धंदा पतकरलेला ! अशाची गांठ आहे आतां या अशा लोकांशीं ! आज पर्यंत कांहीं नाहीं तरी बऱ्याच – ह्मणजे या कामांत आतां माझा इतका मान झाला आहे, कीं कुठें कोणाचें लग्न ठरवायचें झालें, आणि ह्यांत

ह्मणजे जनुभाऊला बोलाचणें नाहीं— अशी गोष्टच कधीं घडत नाहीं ! इकडून नाहीं तिकडून कोणीकडून तरी जनुभाऊची गुप्त संभावना ठेवलेलीच ! पण आतां या रावसाहेबी जुळया जुळवींत संभावनेची आशा सोडलीच पाहिजे ! ह्मणावें, कीं जनुभाऊ, या संभावने बद्दल सोडा न् रावसाहेबांच्या हातावर पाणी ! त्यांना तर नाहींच पण तुह्मी तरी सुधारकांनलें पुण्य पदरीं पाडा ! मीच आतां आपल्याला ह्मणतों— जनुभाऊ, अशा प्रकारचें उदक सोडलें असतां पुण्य घडतें कसें याला सुधारकांचाच आधार आहे ! एकाद्या ब्राह्मण विधवेला पुनर्विवाह कर ह्मणून सांगून उघडा उघड अखंड सौभाग्य देण्यांत जर कसयाच्या हातीं पडलेली गाय सोडविण्याचें पुण्य लागतें, तर अशा पाणी सोडण्यांत कां बरं लागूं नये ? पण जनुभाऊ, आपलीं हीं मतें सुधारकांनलींच हो ! नाहीं तर आपल्या धर्मशास्त्राकडे वळाल ! हे सदसद्विचार देवते— तूं कृपा करून आतां माझ्या विचारा आड येऊं नकोस ! पण माझ्याच कृत्यास मदत कर येवढेंच तुजपाशीं माझें मागणें आहे. कारण सुधारकांच्याच नांवानें रावसाहेबी खोडी मोडण्या करितां उपायांची योजना मला कर्तव्य आहे ! जनुभाऊ, विचार देवतेचा आतां तुजवर प्रसाद झाला आहे— तर तुझ्या अंगांत जितकी अक्कल असेल तितकी खर्ची घालून लाग आपल्या उद्योगाला. [ अम्मळ विचार केल्यासारखें करून ] काय हो चमत्कार हा ! कां मी आपला जुना भोळा माणूसच ! प्रत्यक्ष कीं हो देवी मजपुढें येऊन माझ्या मस्तकावर हात ठेवून गेली ! कीं आतां हा असा विलक्षण काळच झाला आहे— कीं कांहीं तरी स्वेच्छाचार वर्तनाची कल्पना मनांत आली असतां कलीराज इच्छित पुतळा बनून आशिर्वाद देण्या करितां आपला मूर्तीमंत पुढें उभाच ! असो. सध्यां मला जो लोक मान देतात तो माझ्या ऐटीच्या डामडौलाकडे पाहून बराच देता ! आपलें लहानच का होईना पण ह्याला जनुभाऊचा वाडा ह्मणण्यासारखें त्याला ऐश्वर्य आहे ! आपली राम्या गडी, तुरतुर तुर्की चालणाऱ्या तट्टापुढें पळायला आहेच ! जनुभाऊच्या घरीं नाहीं नाहीं ह्मणतां रोजची चार आण्याची नुस्ती पान सुपा-

री उडते, इतकी तर मंडळीची गर्दी असते ! कोण जनुभाऊला गरी म्हणेल ? सल्ला मसलत कोणत्याहि प्रकरणींतली का असेना, लोक आणि जनुभाऊकडे ठेवलेले ! छोटीशीच का असेना- पण कचेरीच्या थाटाल शोभण्यासारखी जनुभाऊच्या ढुंगणाखालीं गादी आहेच ! लुच्चेगिरीच्या थाटाला कसबांत गणली जाईल अशी तर जनुभाऊची वागी आहे !- कीं कोणालाहि सहज् वाटावें, कीं जनुभाऊ सारखा साळसुद मनुष्य हजार पांचशांत एकादाच ! अशा थाटाची ही असामी आहे. ( इतक्यांत जेरूबा नाईक रामोशी येतो, त्याला पाहून, ) पुढें काय करावें याचा विचार होण्यापूर्वीच तशा कृत्याला अनुकूल होणारी मंडळी आपली हजरच ! ( मोठ्यानें ) या तुह्मी जेरूबा नाईक. .

जे०- राम राम भाऊसाब.

ज०- नाईक, तुमच्या त्या जमिनीच्या खटल्याचें कसें काय झालें ? बरेच दिवस झाले तुह्मी आल्याला, आणि त्यामुळें कांहींच मला बातमी नाहीं कळली.

जे०- सम्दं बुडालंन् हान्.

ज०- बुडालें ह्मणजे ? तुमच्या बाजूनें पुरावा तर छान तयार करून दिला होता.

जे०- कसचा पुरावान् बिरावा ! सम्दा [ बोटावर नख उडवून, ] याचा पुरावा लागतोया तथं. तुमाली ह्मटलं, बाईच थोडकस कर्ज मला देऊनशा त्या रावसायबाला भेटा--

ज०- ( मनांत, ) या वेळेला आपली अब्रू घालवायची किंवा नाईकाचा मान कमी करण्याची वेळ नाहीं. केवळ आतां पुढच्या कार्यावरच लक्ष दिलें पाहिजे. [ मोठ्यानें, ] जेरूबा नाईक, तुमच्या जवळून दस्तऐवज लिहून घेतला नाहीं ह्मणून तुह्मांला असें वाटलें होय ? अहो तुह्मी सांगितलेत ३००, आहे का आठवण ? - पण हें काम सख्यांची नड ओळखून रुपये ५०० ची थैली नेऊन मोच ओतली आहे. ठीक आहे; मी आज तुमच्या जवळ रुपये अगर दस्तऐवज मागत नाहीं- पण माझ्या तोंडावर कबूल करून तुमचा असा दगा केला काय ? तर यांचीहि

खोड मोडलीच पाहिजे.

जे०- असं बगा कांईं व्हईल कीं नाईं, तर मी तुमचा गुलाम हाये-

ज०- [ मनांत, ] मी कुंडें त्याला रुपये दिले आहेत, पण तो खाणारा जगप्रसिद्ध आहे म्हणून माझें हें बोलणें याला पचणारें आहे. [ मोठ्यानें ] नाईक, गुलाम कशाला व्हायला पाहिजे ! आज जर याची खोड तोडण्याची खटपट न केली तर माझे रुपये जाऊं द्या, त्याबद्दल मी रडत नाहीं, पण एक तर मजकडे खोटेपणा येतो. आणि दुसरें तुमचें गरिबाचें नाहाक किती नुकसान ! हल्लींच्या दिवसांत तुमचा रामोशीपणाचा हक्क बुडालेलाच आहे, आणि त्यांत ही तुमची जमीन नाहींशी झाली, म्हणजे आली कीं नाहीं तुम्हांला आणि तुमच्या मुलांबाळांना उपाशीं मरण्याची वेळ ?

जे०- आतां तुमाह्मी तो भगवान काय युगुत सांगल तो खरं-

ज०- मी तुमच्या करितां आतां अपील लावीन, लागेल तितका खर्च करीन; पण तुमची तुम्हांला जमीन परत देईन. माझी एक गोष्ट ऐकाल तुम्ही ?-

जे०- ऐकतोन् म्हन्- असं व्ह काय ?

ज०- अशा धर्मलंड लोकांना त्यांच्या खोट्या कर्मा बद्दल त्यांच्यावर कांहीं तरी ईश्वरी क्षोभ झाला आहे, अशा कांहीं झालेल्या गोष्टी त्यांच्या नजरेस आणविल्या पाहिजेत.

जे०- व्हय् व्हय् व्हय भाऊ साव- अंग अशी असं कांहीं तरी झालं पाहिजे.

ज०- तर तुह्मी नाईक, आतां असं समजा, कीं जें मी तुह्मांला सांगणार, तें सगळें जसें कांहीं मला तुह्मांला सांगण्याची ईश्वरी प्रेरणाच झाली आहे. तें मी भाऊ साहेब ह्मणून नाहीं सांगत, तर तुमची कुळ स्वामिणी जगदंबाच सांगते आहे.

जे०- मी ऐकण्यास अगदीं तैय्यार हायेन्.

ज०- तर तुह्मी असें करा, कीं त्याच्या घराच्या पाठीमागच्या गोठ्याला एक दिवस रात्रीची तो घरीं नाहीं अशी संधी पाहून ह्या बत्ती पेटवून. पण त्यांतल्या गाईं मात्र आधीं सोडून द्या हो ?

जं०— ह्य मी करता बगा- अन् त्यो कडवा वी म्यात्र आवंदा दिला है.

ज०— मग चला तर, तुमचाच कडवा तुह्मी जाळतां ! तर तुमच्यावर दोषच येत नाहीं. आणि जरी येत असला, तरी जशास तसें वागलें असतां— तो दोषच अजीबात जळून जातो, असा शास्त्रार्थ आहे. पण ही बत्ती कधीं लावायची तो दिवस मात्र मी तुह्मांला कळवीन. ( इतक्यांत धारवा पवार येतात त्यांना पाहून, ) या तुह्मी राजे.

धा०— अहो कशाचे राव राजे आले आहेत. आमचें पिळदार पागोटें, आणि लफेदार मिशा झाल्या ह्मणजे झालें वाटतें ! थोडा शेतीभातीवर डामडौल करून सरसाल कर्जाची भर करून आहोंत आणि काय !

ज०— काय राव राजे असें बोलतां ! तुमच्या सारखी मंडळी असें बोलू लागली ह्मणजे आह्मी काय बोलावें ? ना उपन्न ना कांहीं !

धा०— भाऊ साहेब, तुमच्या सारखीं माणसें स्वयंभू उत्पन्नच आहेत—— कारण कोणतेंहि काम आमच्या सारख्याला करण्या पूर्वीं तुमच्या पुढें आधीं नारळ आणून ठेवावा लागतो, तेव्हां पुढें काय तो बेत.

ज०— असें जर असेल तर असें ह्मणा, कीं तुमचीं उत्पन्नें, जमिनी, वर्षासनें, पेनसलें, जहागिरी, आणि आमचीं तीं हीं तुह्मीं !

धा०— हा विनोद राहूं द्या घटकाभर. आपल्या त्या कामा बद्दल रावसाहेबांला एक पार्टी गाण्याची द्यायची आहे, तिचा बेत कसा काय करतां?

ज०— अहो तुह्मीं नको—पण तुमच्या कामा करितां पाहिजेल तर रावसाहेबाला मी एक सोडून दाहा पाट्या देईन—पण आपलें काम कांहीं त्यानें रंगावर आणलेंन् आहे का ?

धा०— आपण हा आतां असा कांहीं रंग चढवूं, तेव्हां तें कांहीं रंगावर येणार. बाकी दोन थैल्यांचें एक वेळां पुट दिलेंच, आणि तुह्मी ह्मणतां, कीं माझ्या करितां त्याला एक सोडून दाहा पाट्या देईन. भाऊ साहेब, पाट्या नकोत—पण पार्टी ! गाण्याच्या आणि त्याला विलायती कांहीं जोडून !

ज०— ( मनांत, ) रेफाच्या चुकींत यानें मला धरलें का ? पण ती चूक यावेळीं माझ्या फारच उपयोगी पडली ! ( हांसून व मोठ्यानें, ) नाहीं

नाईक–मी ह्मणतों, कीं त्यानें दोन थैल्या घेऊन काम जर रंगावर आणलें नसेल, तर त्याच्या डोक्यावर एक सोडून दहा पाट्याच देईन.

धा०– तें करूं मग पुढें. पण त्याच्या जवळ लाडकेपणानें बोलायला त्याला आपल्या येथें पार्टीला आणलाच पाहिजे. त्याला पाजून बिजून बरोबर तयार करूं आणि गाण्याला बसवूं. आणि मग तेथें हळूच गोष्ट काढून कबूल करून घेऊं ह्मणजे झालें.

ज०– ( मनांत, ) मला तरी असा प्रसंग आणायला पाहिजेच होता. [ मोठ्यानें, ] मग कधीं बेत करतां तर ?

धा०– तुह्मी सांगाल त्या दिवशीं.

ज०– माझ्या मतें उद्यांचा शनवार बरा आहे.

धा०– माझ्याकडून तयारी आहे.

ज०– पण गाणारीण मात्र फांकडू बोलावा हो ?

धा०– तें तुह्मी मला सुचवायला नको.

ज०– मग रावसाहेबाला आज ही सूचना द्यायची तर ?

धा०– तें काम तुह्मी आह्मी मिळून रात्रीं जाऊन करूं.

ज०– ठीक आहे.

धा०– राम राम तर जातों आह्मी. ( जातो. )

ज०– जेरबा नाईक– हो या रावसाहेबाला खायची कशी संवय लागली आहे, आणि हे लोक तरी पहा कसे आहेत ते ! बरें असो- तर तुह्मी त्याच रात्रीचा बेत धरा. आणि हें काम होईल तर दुसऱ्या एकाद्या तुमच्या विश्वासुक मनुष्याच्या हातून करवा.

जे०– त्यें काम अक्शी बगा त खरं कसं मी करत्यो या- राम राम जातों आमी

ज०– जा. पण विसरूं नका हो ?

जे०– [ जातांना, ] मीं कसा इसरतोय् ( जातो. )

ज०– ( आपल्याशींच, ) आपले दोन डाव तर तयार झाले आहेत. हे साधल्यावर या रंगा प्रमाणें तिसऱ्यावर हात टाकायचा. ( दिवसाकडे पाहून, ) आतां संध्याकाळचा वेळ होत आला आहे, तर शहरांतील आडयाच्या रस्त्या वरून एक चक्कर मारून येऊं.

# प्रवेश ५ वा.

स्थळः- रावसाहेबांचा दिवाणखाना.

पात्रेंः- रावसाहेब. रंगूबाई.- रावसाहेबांचें कुटुंब. चिमाताई- मुलगी. नथु-- मुलगा. जनुभाऊ, घरचा पवार. आणि रामा-- घरचा गडी.

रा०- [ मनांत, ] आमच्या पेक्षां या पोरांना घरांतल्या माणसांना लळा फार ! त्या योगानें तीं जें कांहीं ह्मणतील तें त्यांना खरें वाटायचें. याला कांहीं तरी आतां युक्तीच लढवली पाहिजे. ( मोट्यानें, ) ऐकलें कां- आमच्या चिमाताइचें आतां लग्न करायचें आहे. नवरा पण कसला सोन्या सारखा आहे ह्मणतां ?

चि०- जा आं गडे रावसाहेब, तुह्मी किनई आमची अशी थट्टा करीत नका जाऊं.

रा०- बरें पण त्याला तुह्मी पाहिलेंत तरी का आधीं-

न०- तोच कीं नाहीं हो रावसाहेब-तीन पायांचा, लांब जिभेचा, आणि-

रं०- नथु, पुरे अतलं हो चघळपणाचं बोलणं-

चि०- दादालाच तीन पायांची नि लांब जिभेची बायको करायची नाहीं रावसाहेब-

रा०- आपण असें करूं- कां नथुसाहेब ! तुह्मी सांगाल तसा नवरा चिमाताईला करायचा; आणि चिमाताई सांगेल तशी बायको नथुसाहेबांना करायची.

न०- आह्मांला लग्नच नाहीं करायचें- मग ताईसाहेबांच्या सांगण्या प्रमाणें आह्मांला बायको ती कशी मिळणार ? पण ताईला मात्र तीन पायांचा, लांब नाकाचा व त्यांत मोतीं आडकलेला, आणखी असाच गमतीदार-

चि०- हें पाहिलंस ग आई-मेला नथुटला मला कसं बोलतो तें-

न०- ही पाहिलीत काहो रावसाहेब चिमटली, आईजवळ आपलो कांहीं तरी सांगते आहे !

रं०— अहाहा ! हिचे औंवाळा — बारा वर्षांचा घोडा झाला, तरी अक्कल म्हणून कांहीं नाहीं !

त्रि०— अस्सं—आतां कशी झाली—

रा०— हं — चिमाबाई.

रं०— तिला नको कांहीं दाखवायला—

न०— केव्हां तरी मला बोलणारी कीं नाहीं—

रं०— दमल्या हो, खालीं गेले म्हणजे सांगेन तुला—लहान तोंडीं, मोठा घांस—एवढ्यांपासूनच ही संवय लागलेली कांहीं चांगली नाहीं. मला थारू तो कसा म्हणून मुलांना दाखवायचाच नाहीं.

न०— हो—मी कांहीं तुला नाहीं बोललों म्हणून तूं मला खालीं गेल्यावर मारणार ती. मी ताइटलीला म्हटलं. नाहीं हो रावसाहेब ?

रा०— पण तूं आतां खालीं कशाला जातो आहेस त्यांचा मार खायला ? बायकांची आवड आणि प्रीति खरी म्हटली, म्हणजे जितकी मुलीवर असते, तितकी कांहीं मुलावर नसते !

रं०— ( अंमळ रागा सारखें ) पण पुरुषांची असते ना मुलावर !

त्रि०— आईग, मला कीनई आतां झोंप येऊं लागली, डोळे कसे अगदीं मिटताहेत.

रा०— आज कांहीं ह्यांचें शाळेंतलें लेसन बिसन कांहीं नाहीं करायचें वाटतें? अजून आठ नाहीं वाजले.

त्रि०— मी आपला मघांच धडा पाठ केला.

रं०— तो शाळेंतून आल्या बरोबर आपलं बुक घेऊन बसली होती. पण हे साहेब मात्र उनाडासारखे हिकडून तिकडे तिकडून हिकडे हुतुतु घालीत बसले होते. खेळायची लाज कुठे आहे यांना.

न०— नाहीं हो रावसाहेब — मी आपलें लेसन केव्हांच केलें — आई किनाहीं उगीच कांहीं तरी तुम्हांला सांगते.

रा०— बरें ताईसाहेब, मास्तरणीनें आज तुम्हांला काय काय शिकविलें ?

त्रि०— आज किनाई, तिनं आमचे धडे वाचून घेतले. मग ध्याकरण विचारलं. मग नकाशा दाखविला, अन् मग एक किनई एक मोठी गम-

तोची गोष्ट सांगितली.

रा०— ती कशी काय सांगितली, सांगा पाहूं ?

चि०— आई, सांगू काग ?

रं०— तुला झोंप नाग येत होती ?

रा०— आतां थोडेसें आम्ही बोललों, कीं राग यायचा !

रं०— सांग हो बाई ती गोष्ट—पण सकाळीं का उठायला उशीर केलास म्हणजे सांगेन कसं काय तें.

चि०— मग तर निजतें मी आपली.

रा०— बाई, आजचा दिवस कीं नाहीं, तुम्हांला आम्ही माफी देववूं. शाळेंत जाऊन मुलें काय शिकलीं त्याची आम्ही चौकशी नको का करायला ?

रं०— ज्याची चौकशी करायची त्याला कधीं कांहीं विचारणं होत नाहीं, न जिला शाळा नको म्हणून मी रात्रंदिवस ओरडतें, तिच्या शिकण्याची चौकशी करायची!

रा०— हेंच तें गाड्याचें अर्धे नाक मोडकें ! जर तुम्ही सुशिक्षित बायको असतां, तर या मुलांची अभ्यासाची चौकशी करण्याचें आम्हांला कांहीं कारणच पडतें ना.

रं०— मला असं होऊन गेलं आहे, कीं केव्हां एकदां या ताईचं लग्न होईल—– मग तिच्या सासरचीं तिला शाळेंत घालोत नाहीं तर न शिकवोत—

रा०— लग्नाच्या गोष्टी मग बोलूं—पण ताईनें लवकर घराच्या बाहेर जावें अशी तुमची इच्छा आहे ?

रं०— मलतंच कांहीं तरी बोलायचं ? तर तिची काय घरीं पुजा करून ठेवायची आहे !

चि०— रावसाहेब, मी सांगु ना ती गोष्ट ?

रा०— सांग बेटा.

चि०— आई, तुं किंनई आतां चिप बैस—मला गोष्ट सांगु दे.

रा०— ( हांसतात व तिला पोटाशीं धरतात, )

रं०— असल्याच लाडांनीं तीं मुलं बिघडतात बरं का—

रा०– बेटा सांग गोष्ट पाहूं.

चि०– रावसाहेब– आमची मास्तरीण म्हणाली, बरका–

रा०– काय म्हणाली ?.

चि०– ती असं म्हणाली, कीं मुलींनीं लहान वयांत लग्न करूं नये न् नवरा जो करायचा––

रा०– अग थांबलीस कां ? सांग भराभर–

चि०– आतां किनई मला बाई सांगायची लाज वाटते.

रा०– तुलाग एव्हांशींच कशाची लाज आली आहे ? त्यांतून मास्तरणीनें सांगितलेली गोष्ट तूं सांगणार.

चि०– आई, सांगूं का ग?

रं०– चल चहाटळ पोरी –– मला नको कांहीं विचारूंस.

रा०– सांग सांग मी विचारतों आणि ऐकतों आहेना ?

चि०– नवरा जो करायचा तो आपल्या इच्छे प्रमाणें करावा.

रा०– अं: यांत ग तुला लाजण्यासारखें काय आहे तें ? बरें, आणखी काय सांगितलें ?

चि०– आणखी कायसं सांगितलन्, पण मी विसरलें.

रा०– थोडी आठवण कर म्हणजे तुझ्या लक्षांत येईल.

चि०– रावसाहेब–– आठवण ती कशी करायची?

रा०– ( हांसून, ) अंमळसा डोक्यावर हात ठेवावा आणि डोळे मिटून बसावें–

चि०– हां. झाली आठवण–– पण तें सांगितलं तर आई मला मारील.

रा०– तें काय म्हणून ? आणि मी आहेना जवळ ?

चि०– तिनं सांगितलन्–– सकाळीं उठून आंग धुवून कुंकूं लावण्याची आणि तुळशीची पुजा करण्याची नि प्रदक्षणा घालण्याची जी चाल आहे ती अगदीं वाईट आहे. तसं या शाळेंत येणाऱ्या शहाण्या मुलींनीं करूं नये.

रं०– हा शाळेंत घातल्यानं मुलीला चांगला मोठा लागतो आहे हो !

रा०– एकून ताई आपला नवरा पसंत करणार तर ? कसें काय ताई

साहेब ?

रं०– बोलायचं तों तों आपलं अधिकच ऊत आतं !

रा०– बरें, आणखी कायकाय गोष्टी सांगितल्या ?

चि०– आणखी पुष्कळच सांगितल्या—पण आतां किनई माझे डोळे अगदीं मिटायला लागले––

रं०– पुरे झाल्या त्या चावट गोष्टी—निजतेस कीं नाहीं आतां तूं मला पाहूं दे.

रा०– शाळेंत जाऊन मुलें कायकाय अभ्यास करतात, तो जर तीं घरांत सांगूं लागलीं तर त्यांना दवकवायचें हा कुठला कायदा ?

रं०– आपल्या नजरे पुढं रात्रंदिवस कायदे फिरताहेत, तेवढे पुरे –

रा०– कसें काय नथुसाहेब,—आज तुमचा अभ्यास कायकाय झाला ? आणि तुम्हांला मास्तरानें कायकाय गोष्टी शिकिवल्या ?

न०– टाइमटेबला प्रमाणें आमचे सारे अभ्यास घेतले, आणि लेक्चरर मास्तर आला होता––आणि पण। रावसाहेब––हेडमास्तर देखील तसेंच ह्मणाले !

रा०– लेक्चरर मास्तर काय ह्मणाले, हें सांगायच्या पूर्वीच का हेडमास्तरचा रुकार सांगतोस ?

न०– लेक्चरर मास्तर ह्मणाले—ज्या अज्ञान मुलांचीं आईबापें त्यांचीं लहानपणींच लग्नें करीत असतील, तीं मुलें शहाणीं असल्यास, अथवा त्या मुलांना शहाण्या लोकांनीं शहाणें ह्मणावें अशी इच्छा असल्यास, त्यांनीं आपल्या आईबापांचें ऐकूं नये–

रा०– लहानपणीं लग्नें कां करूं नयेत, याला कांहीं त्यांनीं कारणें सांगितलीं का ?

न०– मास्तर हें बोलत असतां मध्येंच एका दांडग्या मुलानें उठून विचारलें–

रा०– कायरे विचारलें ?

न०– त्याला पण मास्तरांनीं अशी एक सपाटून छडी मारली.

रा०– मी विचारतों, कीं त्या दांडग्या मुलानें मध्येंच उठून मास्तरला

काय विचारलें ? आणि नथुसाहेब तुह्मी सांगतां, कीं त्याला सपाटून मास्तरानें एक छडी मारली !

रा०— तसें नाहीं. त्यानें विचारलेन्—आईबापांचें न ऐकलें ह्मणजे आईबाप रागावतील, आणि तीं आह्मांला घराच्या बाहेर घालवितील. मग आह्मांला खायला कोण घालील—शाळेची फी कोण देईल, आणि मग आमचीं लग्नें कोण करील ? मास्तर लोक यांचा जिम्मा घेतील का ?

रा०— मग मास्तरानें किंवा हेडमास्तरानें त्याच्या या प्रश्नाला कांहीं उत्तर दिलें का ?

न०— मास्तर त्या मुलावर डोळे वटारून पाहूं लागले, आणि दुसरीं मुलें हांसूं लागलीं ! ह्मणून त्याला अशी एक कडकावून छडी मारली ! तेव्हां सगळीं मुलें गप्प बसलीं.

रं०—तसं मुलीचं शिकणं नि असं मुलाचं शिकणं— चांगलं चाललं आहे हो— मला यंदा कांहीं माघाच्या महिन्यांत आमच्या ताईचं लगीन ठेवायचं नाहीं.

रा०— मग नाहीं कोण ह्मणतो आहे ! आमच्या मनांत तर दोन्हीं लग्नें एकदम आणि एकाच मांडवांत उरकून घ्यायचीं आहेत.

रं०— तोंडानं बोलणं मात्र गोड गोड व्हायचं—पण लग्नाची गोष्ट का कुणि बोलायला आलं, कीं जशी कांहीं बाहेर जायची घाई होते.

रा०— असं कधीं झालं ?

रं०— मागची नाहीं गोष्ट सांगत— पण कालचीच दुपारची.

रा०— तुह्मांला वाटलें आह्मी बाहेर गेलों ह्मणून—पण संध्याकाळीं त्यांच्या आमच्या गांठी पडून, काय जीं बोलणीं व्हायचीं होतीं तीं सारीं झालीं.

रं०— कायकाय बोलणीं झालीं तीं मला नाहीं का ऐकवायचीं ?

रा०— तुमच्या कानावर आल्यावांचून तीं कायमचीं कशीं ठरणार ?

रं०— मग आतां सांगायचीं नाहीं का व्हायचीं ?

रा०— तीं जवळ जवळ ठरायच्या लागांत आलीं, कीं तुमच्याच तोंडून कायम करवायचीं. आह्मांला नको ती पंचाईत. बरें नाहींतर बाईंट हें हटवलें मागाहून कुणि ऐकावें ? ह्मणून ह्मणतों, कीं ज्याचें त्यांगीं

श्रविलें म्हणजे आपण आपले मोकळे !

रं०– ( रागांत, ) हीं लफंडाबाचीं बोलणीं किंनाई सगळीं मला कळता मी आपली जुन्या चालीची बायको आहें, म्हणून ठीक आहे. नाहींत अशा बोलण्याचं माझं बरोबर पटत नाहीं म्हणून मी केव्हांच गे असतें– ( उठूं लागते, )

रा०– ( उठून हात धरून बसवितो, ) बसा तर खऱ्या. अगदींच कांहीं आमच्यावर रागावून जायला नको. ( मनांत, ) गुरूची विद्या गुरूलाच न फळो म्हणजे झालें. हा जोंपर्यंत दुसऱ्यास भर देऊन तिसऱ्याला टांगण्याचा प्रकार असतो, आणि त्यांत आपल्याला फिल्यां श्रपिष्ट ( परोपकारी ) म्हणून घेण्याचा मोठेपणा येत असतो, तो चांगला–पण आपल्यावर आलेला प्रसंग वाईट. नुसताच वाईट नाहीं, पण लज्जेनें प्राणाशीं गांठ आणणारा प्रकार आहे.

रं०– कां–उगीच असं बसून काय करायचं आहे ? मी जातें आंत–अजून माझं काम बरंच राहालं आहे.

रा०– काम आपल्यालाच करायचें असतें वाटतें ? घरांत कुणि माणसें नाहींत जशी कांहीं तें करायला ? कांहीं कमी असलीं तर उद्यां दोन जास्त ठेवतां येतील. सहज एखादें विनोदानें कांहीं बोललें तर त्याचा का राग मनांत आणायचा ?

रं०– मला राग तो कशाचा आहे ? काय जीं आपलीं बाहेर सभांतून बोलणीं चालणीं होत असतात, तीं घरांत बसल्या बसल्या मला सर्व कळत असतात. आपल्या शिकवणी प्रमाणें जर कांहीं बायका तयार झाल्या— देव करो नि आह्मा बायकांची अशी स्थिति न होवो !— तर अशा वर्तनांच्या नवऱ्यांना घटकेंतून सत्रा बायका सोडसोडून जातील !

रा०– ( मनांत, ) आतां सांवरून घेतल्या वांचून परिणाम नाहीं. ( मोठ्यानें ) पण यंदा दोघांचीं लग्नें करायचीं, कीं एकट्याच ताईचें ?

रं०– मला नाहीं ठाऊक. जसं कांहीं कोणाला काय करायचं असेल तें त्यांनीं खुशाल करावं.

रा०— परवां आमचीं अशीं कांहीं बोलणीं झालीं—

रं०— आतां का कालचीं परवांवर गेलीं कां ?

रा०— नाहीं चुकलों— परवां नव्हे कालच. हा पहा जिभेला चिमटा घेतला—

रं०— हीं असलीं सोंगें पुष्कळ करायला येतात !

रा०— आतां म्हणा आपल्याला काय वाटेल तें—परंतु आमच्या तोंडून कालच्या बद्दल परवां असा शब्द सहज निघाला, असो. जनुभाऊ आणि मथुबाई यांच्या मनांतून आधीं नथुसाहेबांचें लग्न ठरवावें असें आहे—

रं०— हो भलतंच नाहीं तें— तीं कसं, असं म्हणतील ?

रा०— नाहीं मीच चुकलों— त्यांनीं असें सांगितलें, कीं आपल्या मनांतून विमाताईचें लग्न आधीं ठरवावें असें आहे. मुलांना झोंप लागली वाटतें ?

रं०— तीं अजून जागीं कशाला रहातायेत ? नथूच्या लग्नाची कांहीं आजच घाई नाहीं— पण जमल्यास यंदा करून ध्यायचंच.

रा०— माझा तरी तसाच बेत आहे. पण मी म्हणतों आधीं नथूचें लग्न ठरविलें म्हणजे ताईच्या लग्ना बद्दल फारशी खटपट रहाणार नाहीं. [ इतक्यांत धारवा पवार आणि जनुभाऊ आल्या बद्दल रामा गडी नोंवाची चिठ्ठी घेऊन येतो. ती पाहून मनांत, ] हा विषय आज बोलण्याचा बंद करण्याला हे लोक या वेळेस आले हेंहि फार चांगलेंच झालें. ( मोठ्यानें. ) आज रात्रीचें यांना येण्याला काय कारण ! आज भेट होत नाहीं म्हणून सांगावें !

रं०— कोण आलं आहे तें ?

रा०— जनुभाऊ आणि धारवा पवार—

रं०— आतांशीं जनुभाऊ म्हटलं, कीं कपाळाला पडल्याच आठ्या ! येऊन जाऊन लग्नाची धोंड येऊन पडते !

रा०— नाहीं, बोलावतों, राम्या—

राम्या— जी.

रा०– जा त्यांना वर घेऊन ये. ( दोघे येतात. रंगुबाई आंतल्या दालनांत जाते; व तिघे तीन खुर्च्यांवर बसतात )

ज०– आज राजे कां आले आहेत कळलें का ?

रा०– नाहीं बुवा – मी तरी आतां तेंच विचारणार होतों.

धा०– मी कशा करितां आलों आहें, तें कळविण्या करितां जनुभाऊला आणलेंच आहे बरोबर.

ज०– राजांच्या मनांत उद्यां आहे गाण्याची पार्टी देण्याचा बेत, आणि माझा असा बेत आहे, कीं उद्यांची गाणारीण पसंत पडल्यास तिलाच आपल्या घरच्या लग्नांची राजांकडून सुपारी देऊन ठेवावी.

रं०– [ आंतून, ] कशास नाहीं ठिकाण नि बुधवारचीं लग्नं – अशांत- लं नाहीं का हें जनुभाऊ !

ज०– काकू साहेब, लग्नें कांहीं यंदा रहायचीं नाहींत. तीं झालींच पाहिजेत.

रा०– ( मनांत, ) आमच्या बोलण्याला या वेळेस हा एक बराच पुरावा झाला आहे. [ मोठ्यानें, ] ठीक आहे. पण उद्यां कांहीं कुठें जायचें नाहीं असें असलें पाहिजे.

धा०– कसें जनुभाऊ – उद्यां कांहीं असलें तरी रावसाहेबांनीं आपल्या- कडे आलेंच पाहिजे.

रा०– ( मनांत, ) आतां ओढून फारसें चंद्रबळ आणून उपयोग नाहीं. ( मेमो बुकांत पाहून मोठ्यानें, ) अजून पर्यंत तर उद्यां रात्रीं बद्दल आमच्या मेमो बुकांत कांहीं नोंद नाहीं—

ज०– मग उद्यांची ही नोंद करून ठेवा तर– राजे, तुह्मी तर बुवा मोठे नशिबवान खरे !

रा०– राम्या— पान सुपारीचें तबक आण.

राम्या– जी. ( तबक आणतो, सर्व पानसुपारी खातात. )

ज०– आतां आह्मांला रजा असावी.

रा०– ठिक आहे. आतां मी उद्यांचें विसरणार नाहीं.

ज०– राजे, रावसाहेबांनीं एकदां यायचें कबूल केलें, कीं ते कधीं चुकायचे नाहींत. येतों तर रावसाहेब.

रा०— यावें.

धा०— राम राम— ( शेवट झांड होतो. सर्व जातात. )

## प्रवेश ६ वा.

**स्थळः—रावसाहेबांचं घर.**

**पात्रें:** — रंगुबाई – रावसाहेबांचें कुटुंब. रामभट– राव-साहेबांचा आश्रित. नथु –रावसाहेबांचा मुलगा. श्रीपाद नाईक – एक सराफीचा धंदा करणारा गृहस्थ. तात्या – त्याचा कारकून.

रं०— कांहो रामभटजी, आज नथूला पहायला श्रीपाद नाईक येणार होते, ते अजून कुठे आले नाहींत ?

रा०— ते यावे म्हटलें म्हणजे इतक्या वेळांत – कारण जेवण खाण आटपून त्यांची ही आतां दुकानाला जाण्याची वेळ आहे.

रं०— आतां काय करूं – मेल्यानों तीन वाजायला झाले, इतक्या कां उशिरा त्यांचीं जेवणं होतात ?

रा०—काकू साहेब, ते कांहीं कोणाचे नोकर ना चिकर, आले दुकानांत गिऱ्हाईक चालून तर त्याला माल द्यायचा–

रं०— त्यांचा व्यापार तरी कसला आहे ?

रा०— तुमच्या सुनेला पण ते दागिन्यांनीं मढवून काढतील.

रं०— मेलें मी विचारतें काय नि तुम्ही सांगतां काय ?

रा०— अहो, तेंच तर मी सांगितलें, – तुम्ही जें विचारलेंत तें –

रं०— मला नाहीं तर बाई तें कांहीं समजलं !

रा०— अहो त्यांचा धंदा कीं नाहीं आहे सोन्या रुप्याचा आणि मोत्यांचा– असामी मोठी खबीर आहे. असले जाडी, पण तुम्हांलाहि सवाई व्याही मिळणारे आहेत –

रं०— असलं नाकापेक्षां मोतीं जड झालं कशाला !

रा०— छे छे— तसला नाहीं हो गृहस्थ– मनुष्य कसला सज्जन आहे, पण

विचाऱ्याला एकुलती एक मुलगीच आहे— त्याची संपत्ती कोणाच्या नशिबाला जाते ती जाओ.

रं०– [ मनांत. ] असं स्थळ जमेल तर चांगलं— पण समजूनहि घ्यावं. ( मोठ्यानें, ) भटजी, ती मुलगी तरी तुम्ही पहाली आहेत का ?

रा०– हो हो—माझ्या अरळ त्यांनीं गोष्ट काढाल्या बरोबर आधीं म्हटलं मुलीला पाहूं द्या—

रं०– मग कशी काय आहे ती ?

रा०– मुलगी काय ! आधींच श्रीमंताची– त्यांत मोरी गोमटी, आणि नख शिखांत मोत्यांनीं मढिवलेली !

रं०– आमच्या नथूला शोभण्या सारखी आहे तर !

रा०– ( मनांत, ) नथूला तिच्या स्वरूपा वरून ओंवाळून टाकावा. ( मोठ्यानें, ) हें काय विचारावें ? जसा बेलबागेंतील लक्ष्मीनारायणाचाच जोडा !—

रं०– भटजी, हें किनई तुम्ही भलतंच कांहीं तरी वर्णन करतां !

रा०– काकू साहेब, तसं कांहीं मी म्हणत नाहीं— पण त्या मुलीला पाहून कीं नाहीं— माझे डोळेच दिपून गेले ! त्या मुळें, आतां खरें सांगितलें तर खोटें वाटेल— माझी दृष्टी अजून कांहीं साफ झाली नाहीं !

रं०– असं जर असेल, तर मग कसंही करून ही मुलगी कांहीं तुम्ही हातची घालवूं नका—

रा०– माझ्या मनांत तर ती मुलगी फारच भरली आहे— पण रावसाहेबांना कशी काय पटेल तो पहावें. ( इतक्यांत तात्या येतो. )

ता०– नमस्कार रामभटजी—

रा०– ( उठून, ) या, बसा तात्या साहेब—

ता०– रावसाहेब आहेत का घरांत ?

रा०– त्यांची कचेरींतून यायची अजून वेळ नाहीं झाली.

ता०– [ हळूच, ] नाईक आले आहेत बाहेर.

रा०– कोण श्रीपाद नाईक का— मी तरी त्यांचीच वाट पहात बसलों आहे. काकू, श्रीपाद नाईक नथुसाहेबांना पहायला आले आहेत. मी

बाहेर जाऊन त्यांना घेऊन येतों. [ श्रीपार नाईक येतात. रंगुबाई दाराआड जाऊन उभ्या राहतात. ]

रा० -- बसा, बसा असे लोडा शेजारीं- अरे कोण आहेरे-व्यंकय्या, वर जाऊन नथुसाहेब अभ्यास करीत बसले असतील, त्यांना खालीं बोलावून आण -- तात्याबा बसा असे-

श्री०--- ( बसून, ) दिवस तर आतां अगदीं नजिक येत चालले, आणि आतांशा घटकेची देखील फुरसद मिळेनाशी झाली आहे.

ता०--- गिऱ्हाइकच फार लोटतें, आणि आमच्या सारखा भावानें, चोखपणानें, असा सवदा दुसरे ठिकाणीं गिऱ्हाइकाला पटत नाहीं.

रा०--- साखीच्या दुकानावर असेंच असतें. लहान येतो, थोर येतो, गरीब येतो, कसाहि कुणि येतो,- त्याला आपला दर, दाम, माप- हीं आपलीं आपल्या येथें एकच.

ता०-- ( हळूच, ) जरा लवकर ---

रा०- हो; अरे व्यंकय्या- ( नथु येतो. )

ता०- या बसा असे येथें.

न०- कायहो रामभटजी, आह्मांला कशाला बोलिवलेंत तुह्मी ?

रा०--- ( मनांत, ) रावसाहेबी लाडकीं मुलें हीं ! बरें बोलावलें तर दुसरे लोक आले आहेत त्यांना पाहून तरी उगीच बसावें कीं नाहीं---आतां असलें मूल शहाणें ह्मणून पटवून द्यायचें आहे ! ( मोठ्यानें, ) हल्लींच्या मुलांची आतांशा फारशी परिक्षा घेण्याचें कारण नाहीं--- कारण त्यांचे बाप शहाणे असले ह्मणजे त्यांच्या देखरेखींत त्यांचीं मुलें शहाणीं असायचींच.

श्री०- आपलें नांव काय ?

न०- भटजी, कोणहो हे आमचें नांव विचारणारे ?

रा०- नाईक, हल्लींच्या मुलांच्या आंगीं पहावें तों तिखटपणा फार !

श्री०- दऊत रुमाल आणवून भटजी एकादी यांना पुस्ती काढायला सांगा.

रा०- ( मनांत, ) कपाळ माझें ! मला वाटलें होतें, कीं ही मंडळी आपली चेहऱ्या मोहोऱ्यांत मुलाला पाहून रावसाहेबांच्या नांवावर जातील. पण हे बसले परिक्षा घेत, आणि रावसाहेब घरांत नसायची संधि पाहूनच

आले ! ( मोठ्यानें, ) रावसाहेबांनीं पहिल्या पासून यांना इंग्रजींत शिकायला घातल्यानें हे इंग्रजींत फार फरडे झाले आहेत. रावसाहेब जेव्हां तेव्हां ह्मणत असतात, कीं इंग्रजी आल्यावर मराठीला कांहीं फारसा वेळ लागत नाहीं— तें हं हं ह्मणतां येतें ! आणि आतां मान तरी सारा इंग्रजीलाच आहे.

न०— आहो ओल्ड म्यान— आमचें नांव नथूसाहेब— तुह्मी काय आमची परिक्षा घ्यायला आलांत येथें ?

रा०- पाहिलेंत हें — तीं भाषा तोंडीं बसलेली — आपली निच्यांत जीभ हालायची—

न०— आमची परिक्षा घ्यायची असेल, तर स्कुलांत या, नाहीं तर मास्तर असले वेळीं या—

ता०— ह्मणजे काय होईल ?

न०— आह्मांला नाहीं आलें तर आमच्या क्लासांतील मुलें सांगतील— आणि घरीं असल्यास मास्तर सांगतील.

रा०— कां पहालात ना मुलगा कसा हजर जबाबी आहे तो ? परची शाळाच चांगली—

श्री०— यांचें टिपण आणा—

रा०— रावसाहेबांचा टिपणा विपणावर फार [illegible] नाहीं— फक्त गण गोत्र जमलें ह्मणजे पुरे—

ता०— ( श्रीपाद नाईकाकडे पाहूं लागतो. )

श्री०— ( खुणेनें या मुलांत कांहीं अर्थ नाहीं असें सुचवितो )

ता०— ( हळूच, ) आज टिपण मागून आणा — मग घर हें चांगलें आहे, तेव्हां तें हातचें जाणार नाहीं अशाच तऱ्हेनें आपण मिळवून घेऊं ह्मणजे झालें.

रा०— बरें तर तसें मी करतों.

श्री०— बोलाचाली काय करायची— ती मग आपलीं टिपणें जमल्यावर— तों पर्यंत कमींत कमीं हुंडा किती घेण्याचा रावसाहेबांचा मानस आहे, येवढा खुलासा करून ठेवा.

रा०— हो हो— तो खुलासा काढून मी आपल्याला कळवीनच. आणखी हं

मला टाकून आहेच, कीं हा खळखुंडा करतां कांहीं लग्न मोडणारें तुह्मां दोघांतून एकहि कुणि नाहीं.

ता०- बराहे- तर येतों आतां आह्मी-

रा०- ठिक आहे— पण पानसुपारी तर घ्या ( पानसुपारी दिल्यावर दोघे जातात. रंगुबाई दारा बाहेर येते. )

रं०- कसं काय भटजी ? मुलगा पडतो कां पसंत त्यांच्या ?

रा०- मुलगा हा पसंत न पडायला काय झालें ? आपले नथुजाहेब, कसले ह्मणतां हजर जबाबी आहेत !

रं०- भटजी, पुरे हो तुमचं तोंडा पुरतं गोड गोड बोलणं !

रा०- आतां तुह्मां होतक्षान ना पण येथें ऐकत ? ह्मणून बरं !

रं०- ( रागानें, ) बढावा नथुसाहेब ! चांगलीं उत्तरं दिलीत हो !

न०- मग आणखी कशीं द्यायचीं तर ?

रं०- ह्मणूनच मी कानीं कपाळीं ओरडते, कीं मुलगा आपला लहान आहे तोंच त्याचं लग्न कसं तें करून टाकावं—मोठा झाल्यावर त्याला कांहीं कुणि मूर्ख ह्मणायला नको- आहे मिळविलेलं पुष्कळ-त्याच्या ह्यातीपर्यंत खाण्याची कांहीं त्याला ददात पडणार नाहीं.

रा०- आतां मी नथुसाहेबांच्या टिपणाची नक्कल जातों घेऊन, आणि पाहतों जमवाजमव करून- काकूसाहेब काय सांगूं, मुलगी फारच पण माझ्या मनांत भरली आहे. ( कुंडलीचें टिपण करून घेतो. ) येतो आतां मी—उद्यां सकाळीं येईन- ( जातो. )

## प्रवेश ७ वा.

स्थळः- धारबा पवार यांच्या घराचा दिवाणखाना.

पात्रें:- धारबा पवार; सिमाजी—पवारांचा स्नेही; जनुभाऊ; राव साहेब; गाणें ऐकायला आलेली मंडळी; नाचणारीण; तिचे साजिंदे वगैरे.

[ धारवा पचार रोपनाईना थाट वगैरे बरोबर झाल्याची तपासणी करीत आहेत, इतक्यांत एकानागून एक निमंत्रित मंडळी येत आहे त्यांत जनुभाऊला आलेले पाहून, ]

धा०— वहावा भाऊसाहेब ! ही का यायची वेळ ?

ज०— इतकी गडबड करून इतक्या जलदीनें जरी मीं आलों, तरी आपला राजे साहेबांना आमच्या सारख्या गरीब माणसांवर रोष यायचा तो आलाच !

धा०— भाऊ साहेब, हा थाट सारा तुमच्या जिवा करितां— कांहो चिमाजी-- खरें कीं नाहीं आह्मी ह्मणतों तें ?

चि०— भाऊ साब-- भाऊ साब-- अक्शी जनु-- माझ्या गळ्या शपत हासाहेबांनीं आपला ध्यास धरलानी !

ज०— ( हांसत हांसत ) राजे, आणखी दोनचार असे साक्षी तयार असले ह्मणजे आतां रावसाहेब येणारच आहेत-- त्यांच्या पुढें खटला उभा करण्याची तयारी झाली ! कसें काय चिमाजी, तुह्मी तर या वेळेस आमच्या राजेसाहेबांची बाजू खूप संभाळलीत !

चि०— तुह्मी त काय अक्शी भूदेव ! भूदेव ! कसें इकडचे तिकडे उडाल अक्शी जनु –

धा०— कां भाऊ साहेब-- तुह्मी काय भूदेव ना आतां ? चिमाजी, जरा अमळशानें हे भूदेव पहा, कीं आकाशांत फिरूं लागून स्वर्गावर जाऊं लागतील !

ज०— काय राजे बोलतां हें ! चिमाजी तुह्मी यांचें कांहीं ऐकूं नका.

धा०— आतां बघा कीं, रावसाहेबांना तर येऊं द्या--

ज०— या मंडळींत फिरणें हा कीं नाहीं आमच्या सारख्या लोकांना या लोकीं नर्कवासच समजायचा— पण काय करावें राजे साहेब, तुमच्या करितां या लोकांची कास आह्मांला धरावी लागते !

धा०— ऐकलें चिमाजी—आपले भाऊ साहेब— नाहीं ह्मणायला माझ्या खात्रीचे शुद्ध ब्राह्मण आहेत, आणि यांच्या सारखेहि पण पुष्कळ आहेत— पण त्यांत जेवढे ह्मणून रोजगारी झाले आहेत, त्यांतहि

पण किताबाचे गानकरी मोठे- त्यांतून अशांत नमणारे थोडे !—— आतांच नटके भरानें पहा – यांतली मंडळी आपल्या येथें वरीच येणार आहे–

ज०——राजे, अजून गाणारीण कुठें आलेली दिसत नाहीं ?

धा०——तिला बोलावणें जाऊन मघांच आलें. तिचे साजिंदे पुढें आले आहेत. तीहि आतां इतक्यांत येईल.

ज०——बरें, पण तो तुमचा बेत कसा काय करणार ?

धा०——जसा तुह्मी सांगाल तसा. आपल्या येथें जागा पुष्कळ आहे.

ज०——मी ह्मणतों एकमेकाचें एकमेकाला चोरून आणि निरनिराळ्या वेळीं झालें ह्मणजे बरें——कारण कुणि कोणाला लाजायला नको.

धा०——आतां लाजणारी मंडळी कांहीं कुणि नाहीं—— धडाधड रस्त्यांतून बुच उडवायला कमी करीत नाहींत, ते आमच्या घरांत हो कोणाला लाजणार ! पण भाऊसाहेब, तुमच्या बोलण्यांतला हेतु मी समजलों.

ज०——तर आतां असें करावें; एकिकडे गाण्याला सुरवात करून एकिकडे थोडथोडी मंडळी आंत येऊन हा बेत चालवावा. नुसत्या चहा काफीनें दालन अगदीं सोंवळें असूं द्या, आणि तुमच्या भटारखान्याच्या दोन चार निरनिराळ्या रूम्स ( खोल्या ) असूं द्या.

धा०——( पाहून, ) राधाजी तर आल्या.

रा०—( धारबांना सलाम करून, ) जी हुजूर——

धा०——भाऊ साहेबांना वाटलें होतें, आज राधाजीला यायला सवड होते कीं नाहीं !

रा०—नोकरी पत्करलेली बजावली पाहिजे. ( लाडिकपणानें, ) आज तबियत तो फार बेमार आहे – पण हुजुरच्या घरची चाकरी, तेव्हां आलंच पाहिजे.

ज०— बरें, तर आतां तुमच्या खुंट्या पिळापिळी होऊन तबल्यावर लवकर थाप पडूं द्या – ह्मणजे रावसाहेबांला बोलावणें पाठवायला ठिक पडेल.

रा०— जी हुजूर. ( सूर मिळवा मिळवी होऊन गाण्याला आरंभ होतो. रावसाहेब येतात. गाणें चालु असतां मंडळी आंत जाऊन ताजी तवा..

होऊन येते–मंडळी आपल्या अमलाच्या आणि गाणें ऐन रंगाच्या भरांत येत आहे, तोंच रावसाहेबांच्या घराच्या कांहीं भागाला आग लागल्याची बातमी येते, त्याजवरून सर्व लोकांनी त्या बाजूला आग विझविण्या करितां धांवाधांव होते. )

# प्रवेश ८ वा.

स्थळः— रावसाहेबांचा दिवाणखाना.

पात्रें:— रावसाहेब. हेमाडपंत — जनुभाऊचा प्रेषित मनुष्य. तात्या— श्रीपाद नाईकांचा कारकून. राम्या– रावसाहेबांचा गडी.

हे०– ( रावसाहेबांच्या घरीं जात असतांना आपल्याशींच, ) यांत जनुभाऊचा काय मतलब असेल तो असो ! त्यानें तर कांहीं आपल्याला डाव लागूं दिला नाहीं. माझ्या मुलाला ती मुलगी देविवेता, तर माझें गरिबाचें दारिद्र्य तरी जातें ! पण म्हणतो– ती संन्याशाची पोरगी माझ्या मुलाला केली तर मला जाती बाहेर टाकतील ! आतांशा शहाणे शहाणे लोक खुशाल पिऊन गटारांत पडतात ! भर कोडतांत ते बुटलेराच्या हातचें खाऊन व पिऊन पैशाच्या देण्या बद्दल फिर्यादी करून घेतात ! तरी त्यांना कोणी जाती बाहेर टाकायला येत नाहीं ! आणि मला मात्र त्या संन्याशाची मुलगी केली म्हणून जाती बाहेर टाकणार ! – टाकणार कसचे ? हाच खेळ्या टाकिवणार ! बरें मी म्हणतों जाती बाहेर टाकलें– तर २० हजारांचें सोनें तर आज आपल्या हातीं लागतें आहे ना ? असा २० हजारांचा मालक मी झाल्यावर, सद्ध्यांच्या दिवसांत मी बड्या श्रीमान लोकांपैकीं एक झालों–– आणि पैसेवाला झाल्यावर मला बहिष्कृत करायला कोण येतो ? आणि कदाचित कोणी करूंच लागल्यास–आहेत पैसे माझ्या जवळ; पाहून येईन. मग का मी भितों ? फार फार झालें तर एखाद्या पिठ्यांत जाऊन दोन चार पैसे खर्च करीन, आणि त्यांच्या सारखा एक दिवस गटारांत पडेन–– मग

पहातों मला बहिष्कृत करायला कोण येतो तो ? — पण या कामाला रावसाहेबांनीं आतां रुकार दिला तर बरें ? नाहीं तर ह्मणायचें-- पैशाकडे पैसा जाणार ! तो माझ्या भिकाऱ्याकडे कशाला येतो ? पण नाहीं— तो संन्याशी आहे, आणि जांवयाला पैसा देऊन श्रीमंत करण्या सारखा आहे-- मग तो माझ्या सारख्या कर्मनिष्ट ब्राह्मणाचें घर सोडुन, धर्मभ्रष्ट लोकांच्या घरीं आपली एकुलती एक मुलगी देतो कशाला ? आणि देऊंच लागला, तर तो धर्मानें चालणारा संन्याशी आहे आणि मी आहे— पाहून घेईन..( रावसाहेबांच्या घराकडे, पाहून, ) वः ! हाच शुभ शकून आहे ! कारण माझा विचार संपायला आणि रावसाहेबांचें घर यायला एकच गांठ पडली ! रावसाहेब ह्मण-तातच आहेत, कीं माझें कल्याण करून द्यायचें आहे— तेव्हां त्यांनाच ह्मणावें-कीं ही अशी अशी संधि चांगली आली आहे आणि त्याला मी कबूल आहें— पण आपणच कांहीं मनावर घेऊन कराल तर माझें गरिबाचें कार्य होणार आहे. ( वाड्यांत शिरून, ) आंत वर्दी द्यायला मला कशाला कोण पाहिजे ? मी कांहीं रावसाहेबांचे घरीं परका म-नुष्य नाहीं. ( रावसाहेब बसल्या ठिकाणीं जाऊन, ) पहावें तेव्हां आपलें रावसाहेबांचें कांहीं तरी वाचायचें चाललें असतें— आणि हा दरेस [ पोशाग ] तरी किती नामी शोभतो यांना ?

रा०— [ वर पाहून, ] ओ हो हो— हेमाडपंत ! —

हे०— आज ह्मटलें रावसाहेबांच्या भेटीला यावें — पण आमचें काम करा-यला रावसाहेबांना कांहीं कधीं फुरसद सांपडायची नाहीं !

रा०— काय बुवा आज तुमचें काम आहे? फार तुह्मांला थापा झाल्या— पण आज जें तुमचें काम असेल तें करून टाकायचें.

हे०— आज तर खचित माझें नशीबच उदयास येंत ह्मणायचें !

रा०— ह्मताऱ्या ब्राह्मणाला फार दिवस आशेला लावून उपयोग नाहीं— म-ध्येंच कांहीं झालं तर हेतु मात्र त्याचा रहायचा !

हे०— इतकें तरी समजून मी ह्मणतों, कीं माझें एकदांचें काम करा ह्मणजे झालें.

रा०— असें काय तुमचें काम आहे ?

हे०— असें कांहीं मोठेंसें काम नाहीं—–

रा०— तरी पण सांगा तर खरें—–

हे०— जवळचे चार पैसे कांहीं काढून द्यायला नकोत—–

रा०— मग ?

हे०— कांहीं मोठ्यांशी कोणाला भिडभाडहि घालायला नको–

रा०— मग ?

हे०—ह्मटलें, तर वहात्या गंगेंत कांहींसें हात धुण्यासारखें !

रा०— तें कसें काय ?

हे०— नुस्तें हूं ह्मणून होण्या सारखें आहे—

रा०— आतां तर बुवा ही हेगाडपंती कमालच केलीत !

हे०— हें पहा–पुलावरच्या विठोबाच्या देवळांत एक संन्याशी आला आहे —

रा०— त्या संन्याशा जवळ का कांहीं तुमचें काम आहे ?

हे०—ऐकून तर घ्या आधीं.

रा०— बोला तर.

हे०— त्याच्या जवळ दहा वर्षांची एक सुरेखशी मुलगी आहे—

रा०— संन्याशा जवळ? आणि मुलगी? तर मग तो ढोंगी संन्याशी आहे !

हे०— नाहीं नाहीं– संन्याशी तर सच्चा आहे.

रा०— कसा सच्चा असूं शकेल?

हे०— त्याची ती पूर्वाश्रमांतील मुलगी आहे.

रा०— पूर्वाश्रमांतील ? आणि ती संन्याशा जवळ कशी आली ?

हे०— त्यानें संन्यास घेते वेळीं २५ हजारांची माया आपल्या बायको जवळ ठेवली होती—

रा०— हं ! —

हे०— पुढें संन्यास घेतल्यावर ती लागलीच मेली—

रा०— अरेरे ! त्याला दुसरें कुणी आप्त नाहींत ?

हे०— आप्त पुष्कळ आहेत — पण सारे ते खाऊ आहेत —–

रा०— खाऊ आहेत ? असेनात—

हे०— मुलीचा पतकर कुणी घेईनात—

रा०—कां बरें ?

हे०—याचें ह्मणणें—मुलीचें लग्न होईपर्यंत तिला आपल्या मुली प्रमाणें बाळगावी, तिचें लग्न करून द्यावें, आणि त्या प्रीत्यर्थ केलेला खर्च वेंच वजा करून वरतीं दोन हजार रुपये बाळगणारानें घ्यावे आणि बाकीचे मुलीचें लग्न होण्या बरोबर तिच्या नवऱ्याला द्यावे.

रा०—हं ! असें असेल, तर त्या संन्याशाला सांगा—मी तुझी मुलगी संभाळतों.—इतका कोणाच्यानें परोपकार होत नाहीं !

हे०—[ मनांत, ] हं आतां मात्र चांगलेंच आपलें काम होतें ! नुस्ती गोष्टच ऐकून आधीं यांच्या तोंडाला पाणी सुटलें. [ मोठ्यानें, ] मग राहून द्या तर—

रा०—आपलें काम सांगायचें सोडुन कुठली ही संन्याशाची कथा लावलीत ?

हे०—( मनांत, ) माझीच तर कल्पना फसली ! ( उघड, ) त्याच तर संन्याशा जवळुन माझें काम व्हायचें आहे.

रा०—तें कोणतें ?

हे०—( मनांत, ) उघड सांगुंच का याला आतां ? — पण नको — पण नको ह्मणून तरी हा आतां कुठें आपलें ऐकणार आहे ? जर ऐकणार नाहीं, तर आपला हेतु तरी याला कळविलेला असूं द्या. ( मोठ्यानें, ) त्याची मुलगी माझ्या मुला योग्य आहे. तेवढें त्याला सांगून येवढें कसें माझें काम करा.

रा०—( मनांत, ) हा मुर्खा ! अरे मला कळलें नव्हतें, तों पर्यंत तुला ती मिळाली असती— तर तें ठिक होतें— आतां तो पैसा आणि ती मुलगी माझींच आहेत ह्मणुन समज. पण याच्या तोंडावर सद्यां साखरच पेरली पाहिजे. ( मोठ्यानें, ) येवढेंच कीं नाहीं तुमचें काम— तें मी तिकडच्या बाजूला गेलों ह्मणजे सहज करून देईन. ( इतक्यांत तात्या येतो. )

ता०—( येतांना आपल्याशींच, ) आमचे नाइक एवढेच कोणाच्या मोठेपणाला भुलून आपल्या मुलीचें मातेरें करणारे नाहींत. रावसाहेबांचे चिरंजीव झाले ह्मणुन यांना काय त्याचें ! पैशाकडे त्यांचें पहाणेंच

नाहीं-- कारण जांवई चांगला हुशार असून गरीब असला, तर आहे ही सारी चार लाखांची धन त्याचीच होणार असें ते म्हणतात! मग यांचा जांवई तो मुळचा असला तरी जांवई झाल्यावर भिकारी तो कसा राहणार! तेव्हां मुलगा पटत नाहीं असें न दर्शवतां-- राव-साहेबांच्या तोंडून नकार घ्यायचा इतकीच काय ती आपली कामगिरी आहे-- ( रावसाहेबांच्या जवळ जाऊन, ) नमस्कार रावसाहेब-

रा०- ( मान हालवून, ) बसा तेथें.

ता०- ( बसल्यावर, ) टिपण पाहून २८ गुण जमतात-

रा०- आह्मांला टिपणा वरून फारसा मेळच पहायचा नाहीं.

ता०- ह्मणूनच आमच्या नाईकांनी निराशा झाली नाहीं-

रा०- मग नाइकांचें काय ह्मणणें आहे?

ता०- हात जोडून मुलगी आपल्या येथें द्यायची!-

रा०- देण्या घेण्याची बाबत?

ता०- ते आपल्या गरिबीच्या स्थिती प्रमाणें कबूल आहेत!-

रा०- नाईक गरीब! ( मनांत, ) हा गृहस्थ आहे सराफ- तेव्हां याच्या जवळून नक्की नक्की करून घेतलें पाहिजे. आणि पण तेंहि पाहिजे लेखी.

ता०- गरीबच नाहीं तर काय? पैसा आहे सारा स[illegible] मिळेल तें त्यांचें!

रा०- हें घासाघिशीनें काम नको तर आह्मांला-

ता०- [ मनांत, ] मला हेंच करून घेऊन जायचें आहे! पण निराळ्या खुबीनें. ( मोठ्यानें, ) नाईकांचा हेतु ३२ गुण जरी टिपणांत मिळत नाहींत- तरी त्यांची मुलगी आपल्याच घरीं पडावी असा फार फारच हेतु आहे. आणखी पुढें पाठिमागें काय जें आहे नाहीं, तें देखिल-

रा०- तीं तसलीं गोडगोड बोलणीं मला नकोत. उद्यां नाईकांना मुलगा झाला समजा- किंवा त्यांनीं दत्तक घेतला-ह्मणजे आटपलेंच कीं नाहीं! करणी तर आमच्या मानाला शोभेल अशी झालीच पाहिजे पण हुंड्याचें मान तर अधीं कळूं द्या-

ता०- करणी बद्दल फारसें कांहीं नाहीं- त्यांना ती आपल्या डामडौला

प्रमाणें केलीच पाहिजे—पण हुंड्याचें मान वरिक मोठा आहे असें आपण मानून लोकांत नाइकांचा गौरव केला पाहिजे—

रा०- ( मनांत, ) बुकें हातांत घेऊन अर्थशास्त्र आह्मांला शिकावें लागतें पण त्याचें या लोकांना लहानपणा पासून जसें कांहीं बाळकडूंच घातलेलें असतें ! — मी पण वस्ताद आहें. पुरा अर्थशास्त्र्या बनलों आहें ! ( मोठ्यानें, ) आमच्या इकडे अनुमानिक गोष्टींना फारशी वजनदारी नाहीं— तेव्हां उघड उघड बोलून अशा कामांत ठराव केलेले वजनदार होनात.

ता०— हजार सोडले — पण पांशांजवळ जवळ जरी कांहीं रक्कम बोलायची असती, तरी मी केव्हांच बोलून गेलों असतों—

रा०— मग काय त्यांनहि कमी !

ता०— [ हळूच, ] दीडशें घेऊन माझी मुलगी पदरांत घ्या असें हात जोडून नाइकांचें ह्मणणें आहे.

रा०— ( रागानें, ) आज ह्मणावें रावसाहेबांच्या घरीं मुलींना कांहीं तोटा नाहीं ! पांच हजारांवर जर कांहीं बोलायचें असेल, तर मुलगी देण्याचें नांव काढा — तशांतून तुमच्या मुलीचें बोलणें सुरू झाल्या पासून आमच्या घराला आग लागून आमचें मोठें नुकसान झालें ! तेंहि पण—

ता०- [ मनांत, ] खाशी ! पांच पंचवीस रुपयांचा कडबा आणि दहा वीस रुपयांचें छप्पर जळालें— तेंहि पण नुकसान या हुंड्यांतच वसूल करून घेण्याचा यांचा रंग दिसतो ! तरी रावसाहेब ! —

रा०—आणखी पहा — आमच्या ताईसाहेबांचें लग्न आहे !

ता०— आपल्या सारख्या श्रीमान गृहस्थांना त्याची फारशी विशाद काय आहे ?

रा०— आह्मी अर्थशास्त्र शिकलों नसतों तर तशी गोष्ट संभवनीय होती—

ता०— मग मी अडीचशें पर्यंत बोलतों तर—

रा०—( मनांत, ) दिडशें ह्मणजे दीड हजार अशा अर्थानेंच आपण बोलणें ठेवावें — [ मोठ्यानें ] तुमच्या दीड हजारांना आणि अडीच हजारांना रावसाहेबांच्या ह्मणावें घरीं धुप जळतो आहे !

ता०— ( मनांत, ) हें रावसाहेबी गळे।डू भोळें बोलणें उघड करावें तें

बरें ! [ मोठ्यानें, ] खन्या दीडशा अडीचशाचें मान हजारी रकमेनें मानलें जाईल, तर तेंच आमच्या नाईकांना भूषणावह होईल ! तर आतां आमच्या वहिनी साहेबांच्या ह्मणण्या करितां – त्या ह्मणाल्या, नाईकांनीं न ऐकलें, आणि मुलगी आपल्याच घरीं पडते आहे, तर त्या आपला एकादा दागिना विकून साडेचारशें पर्यंत भर करतील – तर आडीचशें नाईकांच्या तर्फेनें राजरोस, आणि दोनशें त्यांना न कळत आपला मुकाट्यानें मी आणून देईन. आपण आतां कसेंहि करून येवढ्याला रुकार द्यावाच.

रा०– तात्या, तुमच्या नाईकांना सांगा – ह्मणावें लग्नाच्या बाबतींत हा कांहीं रावसाहेबांच्या घरीं लिलांव नाहीं. तुह्मी पहिल्यांदाच आलेत– आणि तुह्मी थोर मनुष्य– तुह्मांला नाहीं ह्मणूं नये ह्मणून आह्मी आपला आमच्या गरिबी मानानें सारा पांचच हजारांचा हुंडा सांगितला–

ता०–हा फार मोठा हुंडा नाहीं का ?

रा०– ह्मणावें तुमच्या मानानें सांगितला असता, तर कमींत कमी निदान २५ हजार तरी सांगितला असता–पण आह्मांला तसें कर्तव्यच नाहीं–कारण कमी हुंड्याच्या बाबतींत आह्मी लेकचरें देत असतों !

ता०– बरें तर नाईकांना मी असें कळवितों––

रा०– [ मनांत, ] याच्या तोंडावर थोडें मधाचें बोट लावून ठेवूं द्या–साधलें तर पाहतां येईल – नाहीं तर हें अन्याशानें प्रकर्ण आलें आहेच ! — ( मोठ्यानें, ) तात्या हें जुळलें –– ह्मणजे आमच्या ह्मणण्या प्रमाणें–कळलें कां– ह्मणजे तुमच्या मेहनती बद्दल एका शेंकड्याचा ऐवज आपला माझ्या पेटींत ठरलेलाच !

ता०– [ मनांत, ] जुळवायचें नाहीं ह्मणून तर मी १५० रुपये हुंड्याचे घेऊन बसलों ! – नाहीं तर आज सारी धन त्या जांवयाच्या फिडची व्हायची आहे, त्याला पांच हजार रुपये हुंडा देण्याला ती कसली पंचाईत ! [ मोठ्यानें, ] तर मी नाईकांना असें असें आपलें ह्मणणें कळवितों !

रा०– ठिक आहे. तर जा. ( तात्या नमस्कार करून जातो. ) कसें काय हेमाडपंत – तुह्मी करतां का ही नाईकांची मुलगी ?

हे०- नकोरे बुवा ! त्याची मुलगी मला गरिबाला काय होय ! त्याच्या सारख्याला तुमच्या सारखे जोडीला शोभणार ! ह्मणतात नाहीं- कुठें इंद्राचा ऐरावत आणि कुठें शामभटाची तट्टाणी !

रा०- एकूण तुमचें मन तर त्या संन्याशाच्या मुलीवर जाऊन बसलें आहे ?

हे०- येवढ्याच करतां, कीं संन्याशाची मुलगी असल्यानें माझ्या मुलाचें आपलें बिनखर्ची लग्न होईल ! संन्याशाची मुलगी असें लोकांत ह्मणवुन घेण्याचा तरी त्याला धाकच आहे ना ?

रा०- अशा संन्याशाची मुलगी तुह्मी आपली सुन करून घेणार तर ! लोक बहिष्कार घालतील ना असें केलेंत तर !

हे० - कोण मला बहिष्कार घालीत बसतो आहे ह्मणा- फारसेंच झालें, तर ह्मणतील-बिचारा गरीब ब्राह्मण त्या संन्याशाच्या नादानें फसला- ह्या याला बारिकसें प्रायःश्चित ह्मणजे झालें !

रा०- बरें तर— त्या संन्याशाकडे जाऊन मी खटपट करून पहातों. [ मनांत, ] बोलायला कां कमी करा ? त्या संन्याशाकडे जायचें आपल्या करितां—पण याच्या करितां ह्मणुन कां नाहीं ह्मटलें ? [ मोठ्यानें, ] तुह्मी जा आतां, आणि तुमच्या करतांच मी सवड करून एक वेळ त्या संन्याशाची गांठ घेईन. मला त्या संन्याशाची गांठ घेऊन काय करायचें आहे – पण तुमचा नाद आहे येवढ्याच करितां मी जाईन.

हे०- मी जाऊं तर आतां ? हें पहा माझ्या करतां येवढी खटपट करून पहाच— माझें गरिबाचें काम होईल.

रा०- खुशाल जा—

हे०- जातों तर मी. ( नमस्कार करून जातो. )

रा०- [ आपल्याशींच, ] रावसाहेब ह्मटलें, कीं लोककल्याणांत मोडणाऱ्या पैकींच तो — आपण तर प्रत्यक्ष रावसाहेब आणि रावसाहेब आहोंत ! तेव्हां संन्याशाच्या मुलीचें कल्याण आपणच घरांत आणुन केलें, तर त्यांत आपल्याला कोण काय ह्मणतो ह्मणा ! तर आतां आपण त्या संन्याशाचीच होईल तितकी जलदी करून गांठ घ्यावी हें चांगलें. ( जातो )

# प्रवेश १ वा.

स्थळ– नदी जवळील विठोबाचें देवालय.

पात्रें:– संन्याशी. विठाबाई–त्याची मुलगी. रावसाहेब, जनुभाऊ आणि मथुराबाई.

सं०– ( आपल्याशींच, ) एकूण जनुभाऊच्या लटपटीची हद्द आहे ! हे रावसाहेब, आज तीन चार दिवस २० हजारांच्या आशेनें हेलपाटे तर घालूं लागले ! पण अजून नुसत्या दर्शनां वांचून त्यांनीं या प्रकर्णीं कांहीं गोष्ट काढली नाहीं. पण २० हजारां प्रीत्यर्थ त्यांना कांहीं नाहीं तरी दोन चार दिवसांत सुमार फळफळावळ आणि मिठाई मिळून रुपया बारा आण्यांचा चट्टा लागला–तेवढ्यावर आमच्या जवळचे २० हजार आणि ही नायकिणीची मुलगी ते उपटणार !! त्यांनीं आपल्या बरोबरच्या शिपायाला मधल्या वेळीं पाठवून आमच्या जवळून आमचा बारोकसा शोध तर काढून नेला–आतां आज ह्मणा—उद्यां ह्मणा, ते ही गोष्ट काढणार खरे !! आपलें तर हें धडधडीत सोंग आहे–कसें पटेल तें पटो ! पण आतां पटविल्या वांचून आपण रहातों कां ? आपण तर तें पटविणारच ! हें देऊळ गांवा बाहेर असल्यानें येथें फारशी रहदारी नाहीं, हें एक चांगलेंच आहे. आणि देवाचा पुजारी गडबडगुंडा करणारा नाहीं हेंहि त्या पेक्षां एक अधिक चांगलेंच आहे, असो. आतां आपल्याला काय कर्तव्य आहे?– हो. जनुभाऊच्या सांगण्या प्रमाणें आपल्या जवळ तीस हजारांची माया आहे–असें रावसाहेबांला दाखवायचें आहे. [ लांबवर असलेलें पाहून, ] कोण ते रावसाहेबच वाटतें–आज अवेळीं कां बरें ? पण आतां त्यांना वेळ काय आणि अवेळ काय !– त्यांचें सारें लक्ष माझ्या सोन्यावर लागलें आहे ! तर आपण आतां त्यांच्याकडे न पहाल्या सारखें दाखवून आपलें सर्व ऐश्वर्य त्यांच्या दृष्टीस पडेल असें केलें पाहिजे. ( विठाबाईच्या आंगावरचे दागिने काढून ठेवूं लागतो. रावसाहेब हळूच तें सर्व पहातात. )

रा०– ( आपल्याशींच, ) हा संन्याशी तर बडा मातबर दिसतो ! अरे,

इतके दागिने या पोरीच्या अंगावर ! आणि ते हा आपल्या ढुंगणा-खालीं घालून ठेवणार ! – हें पाहून आपल्या तर बुवा अंगाची अगदीं लाही होऊन गेली ! त्यामुळें आतां आपली परोपकार बुद्धि बाहेर काढल्या वांचून आपल्या अंगाचा ताप शांत होणार नाहीं आज चार दिवस मी तुमच्या ऐकीव गोष्टींवर होतों– पण आतां तें सर्व प्रत्यक्ष या माझ्या डोळ्यांनीं पाहिल्या पासून माझ्यानें आतां अगदींच धीर धर-वत नाहीं– पण यानें माझें न ऐकलेन् तर ? विशाद काय आहे ? – मी **रावसाहेब** आहें असें त्याला कळल्यावर तो माझ्या ह्मणण्याला रुकार देणार नाहीं असें तर व्हायचेंच नाहीं– होऊंच लागलें – – तर पाहून घेईन–

सं०– विद्याबाई, पुरली तुझी हौस एकदांची ? आतां कांहीं राहिलें नाहीं ना तुझ्या अंगावर ?

वि०– स्वामी, कांहीं नाहीं म्हाले—

सं०– विद्याबाई, अशी रागावूं नकोस— हे सगळे दागिने तुझेच आहेत. तुझें एकदां लग्न करून दिलें ह्मणजे ते सगळे तुझ्या सासु सासऱ्यांच्या हवालीं करून देईन. मग रात्रंदिवस आपले दागिने अंगावर घालून बैस कशी !

वि० – स्वामी, इथें कां नाहीं देत ते तुह्मी मला अंगावर घालायला ?

सं०– वेडे येथें आपण गांवाच्या बाहेर रहाणार— नाहीं पेटी, नाहीं कुलुप– चोर कुणी आला आणि नेलेन् दागिने हिसकावून– ह्मणजे का-य करायचें ? तुला दागिने नाहींसे होतील ते होतील—आणि तूं संन्या-शाची मुलगी ह्मणून तुला नवरा मिळायची पंचाईत पडेल ! आज हे इतके दागिने माझ्या जवळ आहेत, ह्मणून तुझ्या लग्नाची पंचाईत नाहीं मला–त्या आशेनें कुणीहि एखादा गरीब ब्राह्मण आपल्या मुला बरो-बर तुझें लग्न लावायला कबूल होईल–

रा०– ( मनांत, ) हेमाडपंतानें सांगितलेली गोष्ट खरी ! त्यानें तर याच्यां जवळ अजून कांहीं संधान बांधलेन् नसलेना ? आणि हा संन्याशी तर गरीब ब्राह्मणाचीच गोष्ट बोलतो !

वि०– बाबा मला–

सं०– अग–

त्रि०– काय झालं बाबा ?

सं०– तसें म्हणूं नकोस–

त्रि०– बाबा म्हणून का ?

सं०– हं – आतां मी संन्याशी आहें !

त्रि०– बाबा – नाहीं स्वामी–स्वामी मला किनाई शहाणा नि श्रीमंताचा नवरा पाहून द्या–

सं०– ( सुस्कारा टाकून, ) सगळें कांहीं तुझ्या मना सारखें झालें असतें. पण काय करूं आतां ? तो जरी जिवंत असती, तरी सर्व कांहीं तुझ्या मना प्रमाणें करती–

रा०– ( मनांत, ) या प्रश्नोत्तरावर माझें फारच लक्ष लागून राहालें होतें–माझ्या सारखा श्रीमंत, तुस्ताच श्रीमंत नाहीं–पण आणखी अधिकारी असा सासरा मिळाल्यावर हीं दोघेंहि पण खुष होतील ! बरें आणखी कांहीं हीं बोलतात का पाहूं.

त्रि०– मग तर स्वामी, तुम्ही मला एकाद्या गरिबालाच द्याल तर–

सं०– अग पहिल्यानें तो गरीब असला, तरी तुझें लग्न होण्या बरोबर तो श्रीमंत होईल ना !

त्रि०– तो हो कसा स्वामी ?

सं०– अग हे २५ हजारांचे दागिने, आणि ह्या पिशवींतल्या १५ हजार मोहोरा ! मग तुझा नवरा केवढा श्रीमंत होईल ?

रा०– ( मनांत, ) पांच हजारांचें सोनें जास्ती आणि पंध्रा हजार मोहोरा ! अबबब !––ही पुसऱ्याची धन करणार काय ? अरे संन्याशा – आतां नाहीं थांबवत आपल्याच्यानें. पण आपण आत्तांच आलों असं याला दाखिवलें पाहिजे. ( मोठ्यानें. ) स्वामी महाराज–

सं०– [ बसायच्या पेटीवर नीट झांकण पडलें आहे असें पाहून, ] नारायण नारायण– नारायण ?

रा०– नेहमीं प्रमाणें स्वामींच्या दर्शनाला.

सं०– [ हातानें आशिर्वाद देऊन, ] **नारायण–नारायण** ( बसायची खुण करतो. )

रा०– ( बसून, ) स्वामी महाराज, ही मुलगी आपण कोणाची बाळगली आहेत ?–

सं०– [ हांसून, ] आहे एक तो ईश्वराचा प्राणि ? नारायण–नारायण–

रा०– खालीं उंच बसायला काय घेतलें आहे तें ?

सं०– हं अं– नारायण—

रा०– कांहीं डबोलें आहे कीं काय ?

सं०– अं हः – नारायण नारायण– आमच्या या भगव्या वस्त्राला कशाला पाहिजे ?

रा०– ( मनांत, ) हा मादरचोद स्वामी असा नाहीं कबूल व्हायचा. याला निराळीच युक्ति काढली पाहिजे. [ मोठ्यानें, ] मुली, हा घे तुला खाऊ– ( चार पेढे देतो; व बाकीचा पुडा संन्याशापुढें ठेवतो. )

वि०–( पेढे हातांत घेऊन, ) हा नको मला. ( असें ह्मणून स्वामीपुढें ठेवते. )

रा०– [ मनांत, ] अरे, ही मुलगीहि मोठी वस्ताद आहे ! पेढे नको ह्मणते आणि संन्याशा जवळ नेऊन ठेवते ! तेव्हां मादरचोद स्वामीची मादरचोद मुलगी असल्यांत नवल तें काय ? [ मोठ्यानें, ] बरें मुली– हे संन्याशी तुझा कोणग तुझे ?

वि०– हे स्वामी ?

रा०– होय. हे स्वामी कोण तुझे ?

वि०– हे स्वामी माझे बावा–

सं०– ( दरडावल्या सारखें, ) हंः –नारायण.

रा०– हिचें लग्न झालें आहे का ?

सं०– हिची आई होती ती मेली– तेव्हां या मायाजाळानें ती झाली आतां संन्याशाची–संन्याशाच्या पोरी बरोबर लग्न कोण करतो ?

रा०– मग ती तर आपली पूर्वाश्रमांतील मुलगी आहे ?

सं० हं. असें ह्मणतात ! या भगव्या स्थितीला असें ह्मणवून घेण्याचें प्रारब्धीं आलें ! परमेश्वर सत्ता– असो. नारायण नारायण.

रा०– असो. स्वामी महाराज– आपण कांहीं काळजी करूं नका–मी आहें या शहरचा मोठा अंमलदार–तेव्हां पाहिजे तसें करून मी या तुमच्या मुलीचें लग्न करून देईन.

सं०- नारायण नारायण- परमेश्वर सच्चिदानंद तुमचें कल्याण करो-

रा० नाहीं तर माझा मुलगा चांगला हुषार आणि या तुमच्या मुलीच्याच वेताचा आहे-

सं०- नारायण- तर सोन्याहून पिंवळें ! - पण असें करा, त्या वराच्या घरचीं माणसें मला एकदां आधीं दाखवा-

रा०- तीं कशाला ?

सं०- आतां या संन्याशाच्या मुलीचें तुह्मीच परोपकारार्थ लग्न करणार- तर तुह्मांला आधीं सगळें सांगून ठेवलें पाहिजे.

रा०- होय होय. मलाहि पण तें सगळें ऐकून ठेवलें पाहिजे.

सं०- तीं माणसें मला येवढ्याच करतां पहायचीं [ इकडे तिकडे पाहूं लागतो. ]

रा०- इकडे मी आहें तों पर्यंत कुणी येत नाहीं- स्वस्थ बोला.

सं० ( कानांत, ) इतका इतका विषय मी तिला देण्याकरितां आपल्याजवळ गळ्याशीं बांधून ठेवला आहे. ह्मणून ह्मणतों- गरीब कां असेनात, परंतु संभाळणारीं माणसें असलीं ह्मणजे माझ्या मुलीची या जन्मांत कांहीं मला काळजी नाहीं ! पण तो विषय-सावधान झाल्यावांचून मात्र मी द्यायचा नाहीं. हें आपलें तुमच्या जवळ मात्र सांगून ठेवतों— दुसऱ्या जवळ बोलायचें नाहीं.

रा० ( मनांत, ) तुझ्या जवळ कां पैसा असेना ? तो आतां माझाच आहे असें मी समजतों. त्याच्या सरंक्षणार्थ दोहों बाजूला दोन गुप्त शिपाई ठेवीन ह्मणजे झालें.

सं०- विचारांत फारसे पडूं नका-मात्र इतकेंच करा, कीं या येथून माझी सुटका लवकर करा-

रा०- ठिक आहे. ती काळजी आतां तुह्मी नका करूं. ( मनांत, ) तूं जितका लवकर जाशील तितकें मला बरेंच होणार आहे !

सं०- कां ह्मणतों कळलें कां ? ह्मणतों येवढ्याच करितां, कीं कांहीं लोक येथें रोज येऊन माझ्या जवळ कांहीं असेल अशा संशयानें माझ्या जवळ गोडगोड बोलूं लागले आहेत--अणि कांहीं ठेवलें असेल तर या

मुलींचे इजकनी बांधून भटिशीं लग्न उडवून देणें झगतात. पण त्यांत्रा मला कांहीं येत नाहीं विश्वास –

रा०-- त्यांना आपल्याला त्रास होत असेल, तर माझ्या घरीं चार दिवस चला---

सं०-- अं हः -- नारायण नारायण. आपल्या आश्रमाला योग्य नाहीं. पोरगी किती गुणाची आहे ह्मणुन सांगू आणि काय तिच्या नशिबीं येनें कोण जाणें ?

रा०-- कांहीं त्याहा वाचायला शिकली आहे ?'

सं०-- [ सुस्कारा टाकून, ] नारायण नारायण---लिहायला वाचायला- शिवीव करायला-गायला--नाचायला--हावभाव करायला ! -- सर्व कांहीं शिकली आहे --कारण --मी श्रीमंत असल्यानें या सर्व गोष्टी तिला शिकविल्या--आणि इच्या पाठिवरचा शेवटचा सातवा मुलगा जेव्हां मेला, तेव्हां त्या दुःखानिशयानें हा आश्रम घेऊन मी घर सोडलें -पण थोडक्यांतच कुटुंबानें राम ह्मटलेन्-- हरेच्छा ! नारायण नारायण--

रा०-- मली थोडेसें गातेस?

त्रि०-- बाबा--नाहीं स्वामी, गाऊं का हो ?

सं०-- थोडेसें गा आणि नाच पाहूं. ( स्वामी पेटींतून तबला काढून वाजवितात, आणि त्रिवाबाई गाते व नाचते )

रा०-- ( मनांत, ) वारे वः अशीं सन्याशा सारखीं माणसें या दुधाऱ्याचे कामीं पाहिजेत ! अशी बायको आपल्याला पाहिजे होती. पण असो-- ही आपल्यास घरांत याची आहे--

सं०-- बेटा, पुरे आतां दमशील.

रा०-- पुरे मुली आं. [ मुलगी पुरे करते. ] स्वामी महाराज, तुमच्या मुलीच्या गुणांकडे पाहून तर मी खुष झालों. ही मुलगी, तुह्मांला आवडत असेल, तर माझीच सून करतों--

सं०-- नारायण नारायण---मग मला आणखी हो काय पाहिजे आहे ? ही सारी धन आतां तुमचीच आहे. मात्र येवढी गोष्ट कोणाला न कळवितां करा, आणि तुह्मी तिकडे सावधान करी पर्यंत या माझ्या--

मी आहेंच ह्मणा--पण पेटीच्या रक्षणार्थ असें ह्मणून नाहीं-- पण दोन शिपाई माणसें ठेवा--

रा०-- माझें ह्मणा त्याकडे फारसें लक्ष नाहीं-- पण तुह्मी ह्मणतच असाल, तर दोन सोडून चार शिपायांचें गेटच आणून ठेवतों. पण तुमच्या मुलीचा सासरा मी व्हावें असो जर तुमची इच्छा असली, तर पहच्या आठवड्यांतील पहिलाच मुहूर्त पाहून इकडल्या इकडेस मी लगीन उरकून घतों--

सं०-- आतां तुह्मांला वाटेल तसें करा-- माझी सगळी तुह्मांला कबुली आहे. पण येकदां हा माझ्या पेटींतला ऐवज तपासून ठेवा आणि मग जा.

रा०-- ( ऐवज तपासतांना मनांत, ) या ऐवजाचा डोळ्यांना खरेपणा आला होता--पण हाताला नव्हता आला. ( मोठ्यानें, ) तुमच्या ह्मण-ण्या करितां पाहिजे तर पहातों मी. ( संन्याशी पेटी वरून उघतो. आणि एकेक जिन्नस दाखवून पुन्हां पेटींत ठेवतो. ) हें पहालें. आतां मी--

सं०-- तुह्मीच सांगा आतां-- तुह्मीच भेटलेत ह्मणून ठिक झालें. नाहीं तर हा येवढा ऐवज भलत्या सलत्या मनुष्याच्या हातीं कसा देतां आला असता ? आमची काळजी आपली त्या प्रभुला आहे, असो. नारायण--

रा०-- ( मनांत, ) आपलें तर काम झालें. आतां पहाऱ्यावर माणसें आणून ठेवायचीं तीं आतां ठेवूं. पण त्यांना या ऐवजाची बातमी देऊन उपयोग नाहीं. नाहीं तर त्यांतला कांहीं तरी तींच मटकावायचीं ! ( नमस्कार करून मोठ्यानें, ) येतों तर मी आतां.

सं०-- या संन्याशावर तुमचे फार उपकार आहेत--याचे. आतां विसरायचें नाहीं--

रा० आतां नाहीं विसरत. ( जातांना मनांत ) विसरतों कसा ?

सं०-- नारायण--

रा०-- ( वाटेनें आपल्याशींच, ) आतां हेमाडपंताला ह्मणावें -- मुर्खा, असलें जाड अवधान माझ्या सारख्या परोपकारी पुरुषाकडेच आलें पाहिजे. त्याची रे तूं इच्छा कशाला करतोस ? ती मुलगी आणि ४०

हजार आले माझ्या घरांत. आतां जातांनाच ज्योतिषाकडे जाऊन मुहूर्त ठरवून जाऊं म्हणजे झालं--पण नको. आधीं त्या पेन्शनर बुवांकडे जाऊं आणि ते आपली जिन्दगी--निदान निचें मृत्युपत्र जरी माझ्या नांवानें करून देत असले, तर तें लगेच करून घेऊन ताईसाहेबांचेंहि लग्न ठरवावें-- आणि ह्यावीं दोन्ही एकदम उडवून नि काय ? --

सं०-- ( गेलासें पाहून, ) वहायार मी संन्याशी--एकूण धन्य आहे माझी ! कारण हा बार तर मी फार छान उडवून दिला. रावसाहेब फसले म्हणून म्हणायला त्यांना ऐवज कांहीं मी खोटा दाखिवला नाहीं. ऐवज शाहाजोग. मुलगी पण खरी. पण मी संन्याशी आणि ती माझी मुलगी--येवढें मात्र खोटें ! हा ऐवज आणि ही मुलगी पहारा ठेवून हे रावसाहेब घेऊन जाणार-- पण जनुभाऊच्या कारस्थानांतून सुटतील तेव्हां-- [ इतक्यांत जनुभाऊ आणि मथुराबाई येतात. )

ज०-- [ पायां पडून, ] स्वामी महाराज--

सं०-- **नारायण**-- हं हं -- ( बसायची खुण करतो. )

ज०-- मथुबाई, हे स्वामी महाराज फार सज्जन आहेत.

म०-- [ पायां पडते. ]

सं०-- **नारायण**.

ज०-- या चिंडाबाई--या इकडे-- ( चि० येते. )

म०-- ही कोणाची मुलगी ?

ज०-- स्वामी महाराजांनीं एक बाळगलेली आहे. ( कानांत सांगतो. ).

म०-- हिचं लग्न झालं आहे का ?

ज०-- एखाद्या गरीबशा कर्मनिष्ट ब्राह्मणाच्या मुलाला पाहून देण्याचा यांचा विचार आहे. आणखी थोडें-- ( कानांत सांगतो. ) --

म०-- हं हं-- नाक डोळ्यांनीं मुलगी सुरेख आहे हो !

ज०-- ती आपल्या आईबापांच्या वळणावर गेली आहे. बरें स्वामी, महाराज, या मुलीच्या लग्नाचें कांहीं जुळतें आहे कोणाजवळ ?

सं०-- हं **नारायण नारायण**--जिथें योगायोग असेल तिथें जुळून येईल. येथें नाहीं जुळतसें वाटलें, कीं चाललें येथून दुसऱ्या गांवाला--आपलें काय संन्याशाचें !

ज०— येथेंच जुळलें ह्मणजे मी ह्मणतों—चांगलें होईल. कारण हें मुलीचें लोढणें गळ्यांत बांधून संन्याशानें कुठें हिंडावें !

सं०—तुमच्या येथले कोण रावसाहेब का कोणसे मोठे अधिकारी आहेतना ?

ज०— हो हो. बरें मग ?

सं०— **नारायण नारायण**, हं—

ज०— त्यांच्या मुलाशीं का ?

सं०— हं. **नारायण**—

ज०— मथुबाई, पहालेंत ना हें ! तुमच्या आमच्या वांचून या रावसाहेबांनीं परभाऱ्या येऊन हें लग्न जुळविलें ! आतां आहे आपलें कांहीं काम ?

म०— मी पहिल्या पासून ह्मणतच होतें, कीं हा आपल्या हातावर तुरी द्यायचाच ! आलं ना तसं अनुभवाला ?

ज०— ( मनांत, ) एकांशींच हा भाट फोडून उपयोग नाहीं. ( मोठ्यानें ) मुलीच्या सबधानें यानें तर माझ्या हातावर तुरी दिल्या—पण मुलाच्या संबंधानें तुमच्या हातावर कसें काय ?—

म०— मीं दोन तीन स्थळं आणलीं— परंतु हुंड्याच्या बाबतींत हे रावसाहेब कांहीं पटूं देत नाहींत ! यांच्या मुलाला मात्र लोकांनीं ९ नी १० हजार हुंडा द्यावा—नि यांनीं आपल्या जांवयाला मात्र त्याच्या बापाला मारून मुटकून ७ शांला कबूल करविला तर यांणीं आधीं ७ शें देतों ह्मणून मागाहून २ शांवर यायचं ! अशानं कसं जमतं ? आह्मी मध्यस्ती मात्र तोंडघशीं !

ज०— तर त्यांच्या कडून या दोन्ही लग्नांत तुह्मांला आणि आह्मांला वाटाण्याच्याच अक्षता मिळणार !

म०— असं दिसतं खरं ! पण मला वाटतं— तुह्मी दिखिल काळी रेघ ओढलीत ! हें इकडे संन्याशाचं अवधान— तसंच तिकडे दुसरं कोणाचं तरी मारील ह्मणजे झालं !

ज०— ( मनांत, ) इला आपलें काळबेरें का कारस्थान इनक्यांत—पण नको ! ही लुच्ची बायकांची जात असते— न जाणों, हिनें हें ढोंग फोडलें तर सगळेंच बिनसून जायचें ! [ मोठ्यानें ] असो; यंदाच्या वर्षांत रावसाहेबांच्या घरीं कांहीं कार्यच नाहीं असें आपण समजूं ह्मणजे

झालें – बरें चला तर. [ दोघे जातात. ] [ मनुभाऊ एकटाच मागें परततो ]

स०– तुमच्या संकेतो प्रमाणें ऐवज हातांत देऊन खात्री पटविली. आतां पहारा येणार आहे. आमची आतां लवकर सुटका करा म्हणजे झालें !

ज०– आणखी आठ दिवस— कांहीं चिंता करूं नकोस. बरें तर जातों मी — स्वामी नमस्कार–

स०– नारायण— ( सर्व जातात. )

# प्रवेश १० वा.

**स्थळः**– राव साहेबाचें घर.

**पात्रें**:– रावसाहेब.

रा०– ( आपल्याशींच. ) लोककल्याणाचा लोक जो वेडगळ अर्थ करतात तसा मी करित नाहीं ! दुःख भोगायला आपण पुढें होऊन तुमच्या कल्याणा करितां झटावें, येवढें आम्हांला सांगितलं आहे कुणी ? हो. काय ? – " सत्य रुचे अलेपण ॥ तें वचन जगासी " — हें वचन घेऊन मला हो काय कर्तव्य आहे ? आणि—" परद्रव्य परजाया ॥ ॥ पाहून वायां न भुलावें " – वहावा– केवढे मोठे हे साळसुध **तुकाराम** बुवा ! यांना असें म्हणायला त्यांचे काय त्यांत तीन चवल खर्च होताहेत ! पण त्यांतलें इंगित काय आहे हं कुठं त्यांना ठाऊक आहे ? असें पहा– मनुष्या जवळ पैसा आहे, तरच जगांत त्याला सर्व कांहीं आहे ! पैसा नाहीं तर कांहीं नाहीं ! म्हणून पैसा मिळविण्याच्या बाबतींत आपपर म्हणून मला कांहीं नाहीं– आज पोरीमुळें ५० हजारांची दौलत जर घरांत येते आहे— तर तिला म्हातारा नवरा करून देण्यांत मला कांहीं वाईट वाटत नाहीं.–लोक हांसतील– पण पैशापुढें मी त्यांची परवा कुठं करतों आहें ? हांसा हांसा म्हणावें लोकांनों ! सावधान होऊन आमच्या ताइचा नवरा मेला— मी म्हणतों त्यांत माझें अधिक कल्याण होईल ! कारण ( हातांत घेऊन, ) या मृत्युपत्राप्रमाणें

त्याच्या पुतण्यांना लाथ मारून ६० हजारांचा विषय मी आपल्या घरांत आणीन शिवाय असेंच दुसरें एकादें अवधान पत्करायला मुलगी तयारची तयारच ! मुलाच्या बावतींत- संन्याशाची मुलगी- येवढें खेरीज करून आणखी कांहीं नाहीं-- पण बिनबोभाट ४० हजार घरांत येताहेत ! असा घरांत येणारा पैसा सोडून देणारा कोण महामुर्ख असेल तो असो ! या दोन्ही लग्नाच्या बावतींत पै खर्चा वांचून एक लाखाचा ऐवज गपचुप रीतीनें पायीं चालत आपला माझ्या घरीं येतो आहे ! आणखी पुन्हां लोककल्याणाच्या डौलानें ! — ही बातमी अजून गुप्त ठेवली आहे म्हणून ठिक आहे-इचा का घरांत सुगावा दिला असता म्हणजे आमच्यात घरांत ताइच्या लग्नाबद्दल तरी तंटा उपस्थित होऊन हा हातचा लाग जाता ! पण मी कसला कारस्थानी ! उद्यां सकाळावांचून मी घरांत कळवितों कशाला ? ऐन वेळेच्या पूर्वी दोन घटका कळवून कार्यभाग उरकून घेईन म्हणजे झालें ! ( इतक्यांत पत्रें वांटणारा शिपाई जरठ या नांवाचें वर्तमानपत्र आणून देतो, तें हातांत घेऊन, ) हें एक पत्र आपल्या तंत्रानें चालणारें आहे खरें ! यांत आज नव्या नव्या काय बातम्या आहेत पाहूं. " आमच्या आजच्या अंकांत दुसऱ्या बाजूवर ' पिशाच ' या सहीचें एक पत्र छापलें आहे- त्यांतील मजकूर खरा असल्यास या अद्वितीय मनुष्याच्या सुधारणेच्या तत्त्वाची कमालच आहे असें आम्ही समजतों. " आमच्या विषयीं तर हें कांहीं नसेल ! पण कसें असणार-कारण अजून पर्यंत आपलें कारस्थान गुप्तच आहे. बरें वाचूं तर खरें- " या पिशाचानें लिहिलेले रावसाहेब-कोण असतील ते असोत ! परंतु असा निर्दय मनुष्य हल्लींच्या काळांत कुणी उत्पन्न झाला असेल अशी आमची तर कल्पना नाहीं "-बरोबर !- " परंतु असल्यास त्यानें द्रव्यलोभानें संन्याशाची मुलगी पाहिजे तर सून करून घ्यावी !- " काय ? " परंतु काळानें मासून घटका पळानें मृत्युमुखांत सांपडणाऱ्या जिवंत प्रेताला आपली सकुमार मुलगी मृत्युपत्राच्या देणगी दाखल देऊं नये. ही रावसाहेब असणाऱ्या सर्व लोकांनीं इशारत घ्यावी ! " ( संतापून, ) या जरठ पत्राला आजच या पिशाचानें पत्र छापायला कुणी सांगितलें होतें ! ( हात आपटून, )

ही गुप्त बातमी बाहेर फुटली कशी ? — या संन्याशाच्या पोरीची बातमी त्या द्रव्यलोभी भिकारड्या हेमाडपंतानें फोडला असेल— आणि दुसरी—अरे घातक्या देशपांड्या— तुझ्या सख्या चुलत्याची मज कडे येणारी ६० हजारांची संपत्ति तुझ्यानें पहावत नाहीं काय ? आयत्या पिठावर नागोबा व्हायला तुला पाहिजे अं ? उजाडूं तर दे— मग पहातों मी. ( थोडा विचार केल्या सारखें करून, ) यावेळा आतां संतापून उपयोग नाहीं. हें पत्र आधीं मला फाडून टाकूं दे. [ पत्र फाडतो, ] आतां डाक्टाला घेऊन पेन्शनर देशपांड्याकडे जावें, आणि तो खास केव्हां मरतो याजबद्दल सहज खुलासा काढून घ्यावा— [ जातांना ] मग पोटांत काटे भरू या पत्रकर्त्याचा समाचार घेऊं. मी समजून उमजून आपली मुलगी मरणोन्मुख झालेल्या मनुष्याला कां देतों—तें महामुर्खा तुला कळलें नाहीं वाटतें ? अरे, पुनर्विवाहाचा पाट घालण्या करतां— समजलास ? हा पाट घालण्या करितां अशी मुलगी विधवा करावी लागते ! ( जातो. )

# प्रवेश ११ वा.

**स्थळः— रावसाहेबांचें घर—**

**पात्रें**:- रावसाहेब, रंगुबाई, नथु, चिमाबाई, राम्या, रामभट, जनुभाऊ, मथुबाई, संन्यासी, हेमाडपंत इ०—

ज०— ( दरवाज्या बाहेर पडतो इतक्यांत मथुबाई दृष्टीस पडते तिला पाहून, ) बरें झालें मथुबाई, तुम्ही वाटेंतच भेटल्यात त्यामुळें तुमच्या घराकडे जाण्याचें माझें वळण चुकलें.

म०— मीं म्हणतें बरं झालं, कीं मी याच वेळेला तुमच्या घराजवळ येऊन पोंचलें—नाहीं तर तुमची नि माझी चुकामुक पडायची— बरं कालचं जरठ पत्र वाचलंत का तुम्ही ? कोण हो त्यांतले ते पिशाच्चानं लिहिलेले रावसाहेब ?

ज०— मी म्हटलें आणि मला वाटलं— आमची माझी कल्पना आहे हो !— आपण आतां हळूच रावसाहेबांच्या घरा जाऊं—

म०— तुम्हांलाहि पण आतलेच रावसाहेब वाटले ना ?

ज०— आपण जाऊं तर खरे आतां त्यांच्या घरीं —आणि श्रीपाद नाईक पांच हजार सोडून सात हजार रुपये हुंडा देण्यास राजी होऊन त्यांनीं काल रात्रीं मला फारच गळ घातली ! तेव्हां साडेपांच सहा हजारांपर्यंत ठरलें तर पाहूं चला— असलीच कांहीं त्यांच्या घरीं धामधूम—आपली पानसुपारी घेतली, आणि परत आले. नसलीच, तर येवढी गोष्ट काढून पहाली—

म०— चला तर— [ दोघे रावसाहेबांचे घरीं येतात. ]

रं०— ( कांहीं गृहकृत्य करीत असतां यांना पाहून, ) आज बरी हो तुम्ही इकडे वाट चुकलेत ? —

म०— मी तुमच्या ना कधींशी येऊन गेले ? नि तशांतून आतांशा मला काम फार आहे, त्यांत तर मेलं इकडे का तिकडे कसं तें मला व्हायला दिखिल फुरसद होत नाहीं.

ज०— माझी आपली दोन तीन दिवसां आड फेरी आहेच—पण आज मला श्रीपाद नाईकांच्या आग्रहास्तव येणें पडलें !

रं०— काय त्यांचं म्हणणं पडलं ?

ज०— जमलें आहे का कुठें नथुसाहेबांच्या लग्नाचें ?

रं०— अजून कांहीं कुठं दिसत नाहीं.

म०— चिमा ताईचं तरी ?

रं०— नुस्तं रोज उठून बोलायचं होत असतं, कीं आज हें स्थळ पहायचं आहे— उद्यां तें स्थळ पहायचं आहे ! यंदा कांहीं लग्नं उरकायचीं नाहींत; असं वरचो म्हणायचं होतं !

ज०— श्रीपाद नाईक साडे पांच हजार रुपये हुंडा द्यायला आपण होऊन कबूल झाले ! पण मी त्यांना सहा हजारां खालीं कमीला रावसाहेब ऐकायचे नाहींत असें सुचविलें आहे ! काल सार्‍या रात्रभर त्यांनीं मला त्रास दिला होता ! कीं कसेंहि करून माझी मुलगी रावसाहेबांच्या घरीं पडूं द्या ! काकू— तुमच्या स्वभावा बद्दल ते फारच तारिफ करीत होते,

आणि तुमचा स्वभाव त्यांना फारच आवडला आहे ! ( इतक्यांत राव-साहेब घाई घाईनेंच बाहेरून घरांत येतात. )

रा०– ( वाटेनें येतांना, ) घाई आणि सोहाळ्या बद्दल कुणी विचारतील, तर वसले आहे कोण ह्मणा करायला !– आपला खर्च करा आणि यांना खायला घाला !– पण नुस्ती 'पॉलिटिक्यालिटी' लढवायला आपलें काय जातें ? उत्तम उत्तम मुहुर्तांची थाप मारून चालते होऊं–हें तरी इतकें सांगायचें कोणाला ह्मणा– घरांतच कीं नाहीं? ( घड्याळाकडे पाहून, ) ओ हो– आठाला पांचच मारीं कमी ! आतां मात्र उशीर लावल्यास सफाई घात होणार– कारण डाक्तरानें सांगितल्या प्रमाणें सारी एकाच तासाची अवधि आहे ! ( झरझर आंगरखा पागोटें काढून ) कोण आहेरे रामा–जा आणि आनांच्या आतां रामभटजींना– ते जसे असतील तसे जाऊन घेऊन ये– ह्मणावें मुहुर्त चालला—

रं०– कशाचा मुहुर्त चालला ? आहे कसली ही धांदल ?

रा०– आंघोळीचें पाणी लपसायला सांगा आधीं– आणि आपण आंग धुतल्या नसलांत, तर लवकर आमच्या बरोबरच धुवा– दोन्ही लग्नं आज उरकायचीं आहेत– बरोबर बसून देवदेवक ठेवलें पाहिजे !

रं०– ह्मणजे ?

रा०– 'ह्मणजे' मग– आधीं मुहुर्त साधा.

रं०– मुलगा कोणाचा ? मुलगी कोणाची ? आहे काय हें ? मेलं डोंबाऱ्या सारखं नवरा नवरी धरून आणून का हीं लग्नं करायचीं आहेत ?

रा०– आतांचा आधीं मुहुर्त साधून घेऊं आणि मग स्वस्थपणीं तुमच्या ह्मणण्या प्रमाणें दोन्ही लग्नांचे सोहळे एक महिनाभर करूं.

रं०– असा काय तो मेला आजच एवढा मुहुर्त आहे ? अजून पुष्कळ मुहुर्त आहेत– मला नाहीं माझ्या मुलांचीं अशीं घाई घाईनं लग्नं करायचीं ! तीं न यंदा झालीं तरी पतंकरतील !

रा०– माझें ऐका. ( मनांत, ) आतां थापच मारली पाहिजे. ( मोठ्यानें ) मी असें करायला मनुष्यांतून का उठलों आहें ! आजच्या पण मुहुर्त साधनाचें फळ एका अवलियानें मला फारच कांहीं चांगलें सांगितलें आहे !

रं०— ( वेळ लावावा या उद्देशानें, ) ऐकूं तर खरं ?

रा०— ( मनांत, ) अशा गोष्टींवर बायकांचा विश्वास बसत असतो. ( मोठ्यानें, ) त्या अवलियानें दिलेल्या वेळेवर सावधान झालं, म्हणजे उभयतां वधु आणि वर हीं आमरण तरुण रहायचीं !

रं०— उगीच असल्या गोष्टी ऐकायला मी कांहीं आतां पोरसोर नाहीं !

रा०— ( मनांत. ) कशी ऐकशील ! पडलीस या रावसाहेबाची बायको ! आणीक कोणाची असतीस तर ती गोष्ट निराळी होती. [ मोठ्यानें, ] बरें आपण थोरच आहांत पण आम्ही म्हणतों, ज्या अर्थी पुष्कळ खाणा खुणा सांगितल्याच्या योगानें आमचा त्या अवलियावर पूर्ण भरंसा बसला आहे, त्या अर्थी आपला त्याच्यावर विश्वास पटे पर्यंत आपण आमचें ऐकावें अशी आमची विनंति आहे !

रं०— कां हो मथुबाई, असं हें जगाच्या विरुद्ध करणं बरं दिसतं का ? असं आमच्या इथें केलं तर सारं जन हांसेल ! चिमाताईला कोणाला द्याय-ची हें दिखिल कांहीं अजून मला कळलं नाहीं ! नि देवदवक ठेवाय-ची घाई झाली आहे !

रा०— [ मनांत ] मथुबाई या येथंच आतां आल्या आहेत का ? आणखी तो कोण दुसरा— जनुभाऊ ! एकूण हे दोन्ही गांव कुटाळ जसें कांहीं बोलावल्या सारखे हजरच !

ज०— काकु— रावसाहेब चांगलें दिसेल तेंच करतील. हीं त्यांच्याच मुलांचीं लग्नें आहेत ! ( इतक्यांत देशपांड्यांच्या घरून एक बोडका मनुष्य रावसाहेबांना बोलावूं येतो. )

बो० म०— [ ओरडतच येतो. ] रावसाहेब— अहो रावसाहेब— चला चला लवकर— दादासाहेब वारले !

रा०— [ रागानें, ] कोण आहेरे तो ? अजून एक तास अवधी आहे.

बो०म०— बापूनीं सांगितलें, कीं लवकर चला—कारण जायला मंडळी खो-ळंबली आहे.

रा०— ( रागानें, ) जा त्यांना सांग, कीं माझी मुलगी प्रति सावित्री आहे. लग्नाच्या आधीं अक्षता पडूं द्या आणि मग प्रेत बाहेर न्या म्हणावें— हा आलोंच मी आ[ता] ताईला तिकडे घेऊन—

रं०– ( रागानें, ) काय बाई हा चमत्कार! ताईला कशाला त्या प्रेताकडे न्यायची ? त्या प्रेताबरोबर तिचं सावधान करायचं बाई–ऐका हें कनुभाऊ !

रा०– ( मांदलीनें अंगरखा पागोटें घालूं लागतो. ) ताई कुठें आहे ? ताई– अहो चिमाताई–

चि०– ( बाहेर येऊन, ) काय रावसाहेब ?

रा०– चल बेटा मज बरोबर बाहेर.

रं०– खबरदार ग ताई. चल इकडे ये अशी मजजवळ.

रा०– बेटा चल लवकर आधीं माझ्या बरोबर.

रं०– ( हातानें ओढून आपल्या जवळ घेते. ) बैस अशी इथं खालीं– खबरदार हालशील इथून तर.

बो०म०– अहो चला लवकर– ही मंडळी पहा आपल्याच दारावरून दादासाहेबांची पालखी घेऊन चालली आहे !

रा०– [ रागानें ] काय ? दादासाहेबांना इतक्यांतच बाहेर काढलें ? ( दुःखानें खालीं पडतो. )

बो०म०– हो. हे पहा लोक आले.

रा०– सात हजार बुडाले तर !

बो०म०– अहो चला चला–

रा०– या बाप्यानें माझा घात केला ! आपल्याला हे सात हजार रुपये पचावे म्हणून या मादरचोदानें दादासाहेबांला कांहीं तरी घातलं असावें– नाहीं तर तो आज नऊ वाजे पर्यंत मरायचा नव्हे ! अशी कालच डाक्तरा कडुन मी त्याची खात्री करून घेतली होती.

ज०– [ आपसांत, ] मथुबाई, तुम्ही कांहीं म्हणा-- पण या चिमाताईचें कुंकु बळकट, म्हणूनच हे म्हातारडे दादासाहेब देशपांडे आधीं दोन तास मेले ! काय ह मुलीवरचें प्रेम. रामराम !!!

बो०म०–अहो चला. तें मृत्युपत्रांडि पण दादासाहेबांच्या बरोबर जाळायला घेऊन चला म्हणून निरोप सांगायला सांगितलें – चला. येता कीं नाहीं ?

रं०– [ रागानें, ] जा जा– बाप्याला सांग– तुझ्या बापाला देखील तें

म्हणून आतां मिळत नाहीं, आणि मोहि पण येत नाहीं. माझ्या पोरी बरोबर तुम्हा चुलत्यानें सावधान होऊं दिलें नाहींस – ह्मणून म्हणावें त्याची इस्टेट तुला कांहीं पचूं देत नाहीं. लग्न ह्मणजे एक प्रकारचा करार आहे, आणि तो करार ज्या वेळीं झाला, त्याच वेळीं लग्न झालें असा त्या करारी लग्नाचा अर्थ आहे.

रं०– मी ह्मणतें देव पावला– नाहीं तर त्याच्या पैशाच्या आशेनं माझ्या पोरीच्या जल्माचं पोतेरं झालं असतं ! आपलंच ह्मणून ह्मणतां येत नाहीं– पण या पेक्षां कसायाचं काम चांगलं !—

रा०– ( रागानें, ) पोरीचें पोतेरें कशानें होतें ! तिला लगेच दुसरा एखादा छान्दारमा नवरा पाहून पुनर्विवाह करून दिला असता.

रं०– जळलं तें तोंड– त्या जिभेला कांहीं हाडच नाहीं !

रा०– हें स्त्रीदास्यविमोचनाचें पुर्वरूप आहे, परंतु याहि पेक्षां आमच्या मनांतून स्त्रियांना पुष्कळ सवलत करून द्यावयाची आहे ! हा मृत्यु मुखीं पडणारा नवरा आमच्या ताईला नमुन्या दाखल योजिला होता. परंतु धडधाकट नवऱ्याला देखील सोडून देतां येण्या पुरती स्त्रियांना सवलत करून देण्याचा आमचा विचार आहे. आणि तसें होईल तेव्हां स्त्रीदास्यविमोचनाचें खरारूप प्रगट होईल ! बरं हा तुमच्या समजुतीचा विचार तूर्त राहूं द्या. बरें नथुसाहेब कुठं आहेत ?

रं०– कां ? असंच कांहीं त्याच्या लग्नाचं सोंग केलं आहे वाटतं ?

रा०– ( उपमर्द करते असें पाहून, ) आतां आपली अक्कल कळली आम्हां-ला ! ( इतक्यांत संन्याशी येतो. )

सं०– नारायण नारायण– हं हं ? आमची हं हं कुठं आहे ?

म०– ( आपसांत, ) हे त्या विठोबाच्या देवळांतले संन्याशी इकडे कशा-ला आले ?

ज०– [ आपसांत, ] लग्न करतां ! मुहूर्त कोन असेल ना ?!

रा०– ( संन्याशाकडे रागानें पाहून, ) कां हो स्वामी महाराज, तुह्मी ती पे-टी सोडून इकडे कशाला आलेत ? मी आतांच आमच्या नथुसाहेबांस घेऊन तिकडे लग्नाच्या अक्षता टाकण्या करतां येत होतों.

रं०– अनुभाऊ, हें काय या संन्याशाचं घोंगडं आहे ?

ज०– मला कांहीं ठाऊक नाहीं पण आतां इतक्यांतच कळेल.

सं०— हं अं— पण आमची हं हं ? –नारायण–

रं०— [ रागानें, ] आतां काय या मेल्या संन्याशा बरोबर ताईचं लग्न ला-
वायचं आहे वाटतं ? !

सं०— नारायण नारायण–अंहः–पण– ( चिमाताईकडे पाहून, ) हं हं ?

रं०— हा तर मेला वेडक्या संन्याशी दिसतो आहे ! आतां काय याच्या
बरोबर चिमाताईचं लग्न लावायचं आहे वाटतं !

सं०— नारायण–

रं०— निघ मेल्या— माझ्या पोरीकडे पाहून तुझा नारायण कासला चेक-
ळत चालला आहे– निघालास कीं नाहीं बाहेर–

रा०— स्वामी तुह्मी पुढें ना— मी हा असाच मुलाला घेऊन आलों–

सं०— नारायण— पण आमची कुठें आहे ?

रा०— कोण ? कोण कुठें आहे ?

सं०— हं ! – चिठाबाई चिठाबाई !

रा०— ह्मणजे ?

सं०— ती सकाळ पासून नाहींशी झाली !

रा०— सकाळ पासून ? पहारेकरी कुठें आहेत ?

सं०— खाशी ! नारायण–ते सकाळ पासून तिच्या शोधाला गेले आहेत !

रा०— पेटी जवळ पहारा कोणाचा आहे ?

सं०— नारायण. अहो पोरीबरोबर पेटी तुमच्याकडे आली ! माझी चि-
टाबाई कुठें आहे ? नारायण नारायण–

म०—स्वामी, तुमची मुलगी नाहींशी झाली कीं काय ?

सं०— या संन्याशाची मुलगी आणि या रावसाहेबानें पळविली ! माझे चा-
ळीस हजार आणि पोरगी !– [ रडूं लागतो. ]

म०— छे, असें कसें होईल. जा आतां तुह्मी. तुमच्या मुलीचा तपास
रावसाहेब लाविवतील.

सं०— नारायण नारायण— माझे ४० हजार !

रा०— हा कांहीं तरी दगा मला वाटतें त्या हेमाडपंतानें केला असेल ! को-
ण आहेरे राम्या – ( इतक्यांत हेमाडपंत रागा रागानेंच येतो. )

हे०— वहावा वहावा रावसाहेब ! त्या संन्याशाची पोरगी पैशाच्या आशे-
करून धर्माचा सारा भ्रष्टाकार करतां काय ? –– पहातों तुमच्या

मुलाचें त्या संन्याशाच्या कार्टी बरोबर कसें लग्न लागणें तें ? कुठें आहे तो संन्याशी ? हा चाललों मी त्याच्याकडे. असल्या धर्मभ्रष्ट संन्याशाचें आधीं डोकेंच फोडून टाकतों.

ज०— हेमाडपंत, हा ताव तुह्मी कोणावर झाडतां ? आहांत कुठें आणि कोणा विषयीं बोलतां याचा कांहीं विचार तरी !

हे०— रावसाहेब झालि ह्मणून काय झालें ? संन्याशाच्या मुली बरोबर आपल्या मुलाचें लग्न लावतील ? कोण भ्रष्टाकार हा !

ज०— अहो. रावसाहेब संन्याशाच्या मुली बरोबर लग्न कशाला लावतील ? त्यांच्या मुलाला काय मुली थोड्या आल्या आहेत ? श्रोपाद नाईक तर काल रात्रीं ६ हजार रुपये हुंडा द्यायला तयार झाले आहेत ! त्यांची देखील मुलगी हुंडा कमी ह्मणून राव साहेब करीत नाहींत ती हो त्या संन्याशाची मुलगी ते कशाला करताहेत? अहो, रावसाहेब, ह्मणजे पैशानें, विद्येनें —मोठे थोर आहेत, तेव्हां ते असें कसें करतील ?

हे०— कशाचे हे थोर आले आहेत ! थोर थोर ह्मणूनच आतांशा असे कांहीं लोक लफाड्या करायला लागले आहेत ! तो संन्याशी २० हजार रुपये देतो आहे ना यांना ?

रा०— कुठें आहे तो संन्याशी ? [ दिसत नाहीं असें पाहून, ] अरे मादरचोद रे मादरचोद ! मादरचोद संन्याशी पळाला— पळाला वाटतें ! अरे धरा धरा त्या संन्याशाला त्या विठोबाच्या देवळांत जाऊन—हा दोहेरी घात झाला ! ( संन्याशाला धरायला जातो. )

ज०— [ आपसांत. ] मथुबाई हें माझें कसब ! या रावसाहेबांना पैशा विषयीं हावरेपणा, तो कसा मिळवावा या विषयींची त्यांची अक्कल, आणि सुधारणेची ह्मणून दिशा पाहून घ्या—

म०— [ आपसांत, ] हें सगळं गारुड तर तुह्मीच का रचलं होतंत ? धन्य गं बाई तुमची ! अजून तरी हे लोक उमजतील का ? मी ह्मणत होतें, कीं हे लोक शहाणे शहाणे— ह्मणून त्यांच्या नादीं लागलें— पण असलं हें यांचं शहाणपण !

ज०— ( आपसांत, ) हे तर उमजायचे नाहींतच—पण या लग्नाच्या बाबतींत तरी कांहीं सुधारीत ह्मणजे झालें मी ह्मणतों. नाहीं तर आतांशा हुंड्याच्या मानाकरितां आमच्यांत फारसा नाहींत परंतु प्रभूंच्या वगैरे

जातींत ३० — ३० वर्षांपर्यंत मुली लग्नाच्या वाढल्या आहेत ! मग अशा मोठाल्या मुली वाढवून यांना काय आणखी निराळा सुधारा करायचा आहे कीं काय कोण जाणें ! —— चला आतां पुढें रावसाहेब काय करतात तें पाहूं——

मं०— मी ह्मणत होतें, कीं मुली मोठाल्या वाढविणें हा एक नवीन सुधारा आहे ! पण छेः— श्रीमंत न का मिळेना— गरीबशाच एखाद्या नवऱ्याला दोन दोन तीन तीन बायका करून दिलेल्या बऱ्या ! पण हें स्त्रियांचें १० वर्षांपुढें अविवाहित रहाणं नको—— तशांतून या चिटशा खपाट्या करणाऱ्या शिकलेल्या मुलींचं तर नकोच. पण काय बाई मेली या लोकांची चाल पडली असेल ती पडो ! त्यांना त्यांची कुणी चुकी दाखविली तर त्यांच्या अंगाचा तिळपापड होऊन " मेल्या तुझं तळपट होवो " असं ह्मणून खुनशी रहाण्याची जशी आमची बायकांची चाल आहे, तसंच ते करूं लागतात !

ब:— हीं असलीं धर्म बुडवीं कृष्ण कारस्थानें कायदेशीर रीतीनें बाहेर पडण्यासारखीं नाहींत. परंतु आपण करीत असलेल्या कर्मांवर ब्राह्मण घालण्या वारनां, अमक्याचें चिरंजीव, तमक्याचे जांवई, अमकीने पति, तमकीचे सासरे वगैरे वगैरे असं असतां—मुळमुद्दा सोडून अशांगीं असें असें करणें—ह्मणजे जगाला आवडतें आणि यांना मात्र नावडतें हो —तें बरोबर नाहीं असें ह्मणून शिष्टाची पेट मारण्याचा एक प्रकार यांनीं काढला आहे ! बरें १० वर्षां पुढें स्त्रियांचें अविवाहित रहाणें तुह्मांला कां आवडत नाहीं ?

म०—— तो आपला आमचा बायकांचा विषय आहे ——आपलं सांगितलेलं ऐका ह्मणजे झालं !

र०——— मथुबाई, पहालंत ना हें कसं लोकांन हांसं करून घेतलं तें ! आतां आपाची काय करायचं होतं हें कोण जाणं——नानुभाऊ तुह्मी तरी कांहीं सांगा जाऊन. तुमची तरी ह्या थोडीशी अक्कल.

ज०—( मनांत. ) माझ्या वांचून हें शेवटास कसें जातें ? ( मोठ्यानें. ) रावसाहेबांचा स्वभाव आहे थोडा तापट तेव्हां मला त्यांच्या पाठीमागून गेलं पाहिजे [ जातो. ] [ सर्व जातात. ]

श्री कृष्णार्पणमस्तु.